16-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1



**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याकरिता निर्णय घेण्याबाबत**

**(1) * 42089 श्री.संजय दत्त , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती अलका देसाई , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.विनायक राऊत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 1 मे, 2013 रोजी महाराष्ट्र दिनी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याचे आश्वासन विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय मार्च, 2013 च्या अधिवेशनात दिले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, दिनांक 1 मे, 2013 रोजी वा त्या सुमारास महाराष्ट्र दिनी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ठाणे जिल्हा विभाजनाच्या संदर्भातील अहवाल मंजुरीच्या प्रतिक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, ठाणे जिल्हा विभाजन पुढे ढकलण्याची कारणे काय आहेत,

(5) असल्यास, ठाणे जिल्हा विभाजनाबाबत शासनाकडून किती दिवसात निर्णय घेण्यात येणार आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) होय,

(2) होय,

(3) होय,

(4) ठाणे जिल्हा विभाजनाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, सदर निर्णय व्यापक स्वरुपाचा असल्याने प्रस्तावित आवर्ती व अनावर्ती खर्चासंदर्भात वित्त विभागाची सहमती प्राप्त करुन घेण्यात येत आहे.

(5) मत्रिमंडळाच्या मान्यतेने निर्णय घेण्यात येणार आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करणे हा अत्यंत ज्वलंत व अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विषय आहे. या सभागृहामध्ये या विषयाबाबत वेळोवेळी चर्चा झालेली आहे. देशातील सर्वात मोठी लोकसंख्या असलेला हा जिल्हा आहे. या जिल्ह्यामध्ये ग्रामीण, सागरी, डोंगरी भाग अशी विविधता आहे. या जिल्ह्याची एकूण लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र, प्रशासकीय सोय या सर्व गोष्टी विचारात घेऊन विभाजन होणे गरजेचे आहे. शासनाने दिनांक 8 फेब्रुवारी, 2012 रोजी कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली होती. त्या समितीने सुध्दा ठाणे जिल्ह्याचे दोन जिल्ह्यांमध्ये विभाजन करण्याची शिफारस केलेली आहे.

2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ता.प्र.क्र.42089..... श्री.संजय दत्त.....

सभापती महोदय, माझे या संदर्भात दोन स्पष्ट प्रश्न आहेत. या प्रश्नांपूर्वी मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देतो की, दिनांक 20.12.2012 रोजी या विषयाची सभागृहात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावर विस्ताराने चर्चा झाली होती. मी विचारलेल्या प्रश्नावर मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. ते मी वाचून दाखवितो. " मला प्रोसिजरचा उल्लेख करावा लागेल, हा विषय आम्ही मंत्रिमंडळासमोर नेत आहोत. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर प्रारुप अधिसूचना निघेल व त्याद्वारे हरकती व सूचना मागविण्यात येतील. जनतेच्या सूचना व हरकती आल्यानंतर या विषयाला अंतिम स्वरुप दिले जाईल." दिनांक 20.12.2012 रोजी सभागृहामध्ये मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते. त्यानंतर आजपर्यंत या विषयावर काय प्रगती झाली आहे, मंत्रिमंडळामध्ये चर्चा झाली आहे काय, जनतेकडून हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत काय याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहाला माहिती द्यावी.

दिनांक 26 जानेवारी रोजी, 1 मे रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री महोदय, उप मुख्यमंत्री महोदय आणि मंत्री महोदय स्वत: करतात. त्या आम्ही नेहमी ऐकतो. या जिल्ह्याचे विभाजन कशामुळे अडले आहे, हे विभाजन एखादी अदृश्य शक्ती अडवित आहे का ? असल्यास, त्याची माहिती मंत्री महोदयांनी आम्हाला दिली तर आम्ही सरकारच्या पाठीमागे उभे राहू आणि त्यांना याबाबतचा निर्णय लवकरात लवकर घेण्यासाठी विनंती करु.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयाच्या पाठीमागे कोणतीही अदृश्य शक्ती काम करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सभागृहाला दिलेली माहिती अत्यंत खरी आहे. या सभागृहाच्या माध्यमातून हा प्रश्न सुटण्यासाठी ते सातत्याने पाठपुरावा करत असतात. ठाणे जिल्हा हा राज्यातील सर्वात मोठा जिल्हा आहे. या जिल्ह्याची लोकसंख्या 2011 मध्ये 1 कोटी 15 लाखापेक्षा अधिक झालेली आहे. 1991 ते 2011 या 20 वर्षात या जिल्ह्याची लोकसंख्या दुप्पट झालेली आहे. या जिल्ह्यात 7 महानगरपालिका, 5 नगरपरिषदा, इतर प्राधिकरणे, 4 लोकसभा मतदार संघ, 24 विधानसभा मतदार संघ आहेत. अशी स्थिती राज्यातील इतर कोणत्याही जिल्ह्यात नाही. या जिल्ह्यात विविधता आहे, आदिवासी विभाग, डोंगरी विभाग,

3.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42089.... श्री.बाळासाहेब थोरात....

सागरी विभाग आहे म्हणून त्याचे विभाजन झाले पाहिजे अशा प्रकारचा प्रस्ताव होता. यासाठी शासनाने कोकण विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. त्या समितीने ऑक्टोबर, 2012 मध्ये शासनाला अहवाल सादर केला असून त्यामध्ये जिल्ह्याचे विभाजन करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

या विभाजनामध्ये एकच अडचण आहे. या जिल्ह्याची भौगोलिक स्थिती विचारात घेता तेथे दोन प्रशासकीय कार्यालये उभी करावी लागणार आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42089.... श्री. बाळासाहेब थोरात...

त्याबाबतीत वित्त विभागाचे अभिप्राय मागविलेले आहेत. 50-60 पेक्षाही जास्त कार्यालये निर्माण करावी लागणार आहेत. अधिकारी तसेच कर्मचारी संवर्ग उपलब्ध करुन द्यावा लागणार आहे. मूळ ठाणे जिल्ह्यामध्ये असणारे अधिकारी आणि कर्मचारी किती, ते शिफ्ट झाल्यानंतर काय परिस्थिती असेल या सर्व बाबींचा गोषवारा त्या त्या विभागाकडून मागविलेला आहे. तसेच यासाठी येणारा खर्च यासंबंधीचा देखील प्रस्ताव मागविलेला आहे. महत्वाचा प्रश्न हा जिल्हा सहकारी बँक आणि जिल्हा परिषद यांच्या संबंधीचा आहे. जिल्हा परिषदेची निवडणूक दीड वर्षापूर्वी झालेली आहे. विभाजनानंतर दोन जिल्हा परिषदा करावयाच्या झाल्या तर पहिली जिल्हा परिषद बरखास्त करावी लागेल. अशा विविध कारणांमुळे विभाजन अडलेले आहे. या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर चालढकल करणारे आहे.

श्री. रामनाथ मोते : ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाच्या संदर्भात 2012मध्ये समिती नेमण्यात आली. 1990 पासून हा विषय प्रलंबित आहे. माननीय श्री. शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी 1990, 1993 आणि 1994 असे तीन वेळा सभागृहात विभाजनाच्या संदर्भात आश्वासन दिले होते. तरी देखील गेली 23 वर्षे कोणतीही कार्यवाही झाली नाही. मूळ प्रश्न असा आहे की, शासनाला ठाणे जिल्ह्याचे विभाजन करावयाचे आहे की नाही ? ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याची शासनाची इच्छा असेल तर 23 वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न किती दिवसात निकाली काढण्यात येणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : मी मघाशी सांगितले की, जिल्हा सहकारी बँकेचे विभाजन तसेच जिल्हा परिषद बरखास्त करावयाची की नाही हे दोन प्रश्न आहेत. या गोष्टीमुळे विभाजन अडलेले आहे. तसेच कार्यालये देखील खूप आहेत. आवश्यक असणारा अधिकारी आणि कर्मचारी संवर्ग या सर्व बाबींचा अहवाल आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री. निरंजन डावखरे : ठाणे जिल्हयामध्ये नागरी, सागरी आणि डोंगरी भाग आहेत. या ठाणे जिल्ह्यामध्ये 7 महानगरपालिका आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे या ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाच्या संदर्भात 26 जानेवारी, 1 मे, 15 ऑगस्ट अशा तारखा घोषित करण्यात आल्या. परिस्थिती अशी आहे की, डहाणू भागातील एखाद्या माणसाला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42089.... श्री. निरंजन डावखरे....

जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कामासाठी यावयाचे असेल तर त्याला ठाण्याला येऊन दोन-दोन दिवस मुक्काम करावा लागतो. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांनी मघाशी ज्या काही अडचणी सांगितल्या त्या अडचणी सोडविण्यासाठी ठाणे जिल्ह्याचे विभाजन झ ााल्यानंतर मार्ग निघेल. म्हणून ठाणे जिल्ह्याचे लवकरात लवकर विभाजन केले जाईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य श्री. निरंजन डावखरे यांनी मूलभूत गोष्टी सांगितल्या, त्या लवकरात लवकर करण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : ठाणे जिल्ह्यामध्ये आदिवासीबहुल क्षेत्र मोठे आहे. म्हणून स्वायत्त आदिवासी जिल्हा झाला पाहिजे अशी आदिवासींची मागणी आहे. ठाण्याला सागरी किनारपट्टी असल्यामुळे सागरी तालुका झाला पाहिजे अशी मागणी आहे तसेच नागरी विभागही स्थापन झाला पाहिजे अशी मागणी आहे. असे तीन स्वतंत्र विभाग करावयाचे असताना दोनचा प्रस्ताव जाणीवपूर्वक आणण्यात आला हे खरे आहे काय ? तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या अंतर्गत भांडणामुळे जिल्ह्याचे विभाजन अडलेले आहे काय ? राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वाढेल अशी भिती काँग्रेसला वाटते, हे खरे आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : यामध्ये कोणतेही राजकारण नाही. हा प्रशासकीय विषय असून तो प्रशासकीय पध्दतीने हाताळलेला आहे. ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाच्या संदर्भात कोकण आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. या समितीमध्ये अधिकारी सदस्य होते. या समितीने एकत्रित विचार करुन प्रशासकीयदृष्टया काय योग्य होईल यादृष्टीने निर्णय घेतलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 11:10

ता.प्र.क्र.42089....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदय अतिशय गोल-गोल उत्तर देत आहेत. माननीय श्री.अंतुले साहेब हे या राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी ते लातूर येथे गेले असताना त्यांनी जाहीर केले की, मी तीन जिल्हयांचे विभाजन करतो. दुसऱ्या दिवशी तीन जिल्हयांचे विभाजन झाले आहे. जिल्हा विभाजनाच्या बाबतीत 1980 साली माननीय श्री.अंतुले साहेबांनी जी कार्यवाही केली, त्या कार्यवाहीचे रेकॉर्ड तपासण्याचे काम माननीय मंत्री महोदय करतील काय, जिल्हा विभाजनाची कार्यवाही करताना त्यांनी कोणती कमिटी नेमली होती, कोणकोणत्या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी त्यांना वेळ लागला नाही, या गोष्टीचा अभ्यास करण्यात येईल काय ? माननीय मंत्री महोदयांकडून सातत्याने सांगितले जात आहे की, जिल्हा परिषदेचे विभाजन होईल, जिल्हा मध्यवर्ती बँकांचे विभाजन होईल. मी या बाबतीत सांगू इच्छितो की, धुळे, परभणी, भंडारा या चार जिल्हयांचे विभाजन झालेले आहे. परंतु तेथील जिल्हा मध्यवर्ती बँकाचे विभाजन झालेले नाही. त्या ठिकाणच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका एकत्रितपणे काम करीत आहेत. मला वाटते की, या प्रश्नाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी अभ्यास केलेला दिसून येत नाही. आमच्या सारखे थोडासा अभ्यास करणारे सदस्य या सभागृहात आहेत. माझ्या आधी चार सन्माननीय सदस्यांनी ठाणे जिल्हा विभाजनाच्या बाबतीत प्रश्न विचारले आहेत. त्यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदय हे तेच तेच उत्तर देत आहेत. माझा असा प्रश्न आहे की, दिनांक 15 ऑगस्ट, 2013 रोजीपर्यंत ठाणे जिल्हयाचे विभाजन होईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, राज्यात ज्या जिल्हयांचे विभाजन झाले तेथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे विभाजन झाले नाही, त्या एकत्रितपणे काम करीत आहेत ही गोष्ट खरी आहे. सहकार विभागाने यासंदर्भात जो अहवाल दिलेला आहे, त्याचा उल्लेख मी केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांच्या अभ्यासाबद्दल माझ्या मनात शंका नाही.

**उप सभापती** : विभाजन लवकर डिक्लेअर करा नाही तर हा प्रश्न चालूच राहील. हा प्रश्न संपणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ठाणे जिल्हयाचे विभाजन करावयाचेच आहे असा शासनाचा पक्का हेतू आहे. परंतु त्यासाठी येणाऱ्या अडचणी दूर करुन विभाजन करावयाचे आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42089....

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, ठाणे जिल्हा हा राज्यातील सगळयात मोठा जिल्हा असून तेथून 24 विधानसभा सदस्य म्हणून निवडून येतात. एक गोष्ट स्पष्ट आहे की, अशा विषयाचा देश पातळीवर विचार करण्यात येऊन नवीन छोटी राज्ये निर्माण केली जातात. प्रशासकीयदृष्टया अतिशय महत्वाचे, ज्याची यंत्रणा त्या जिल्हयातील नागरिकांना अतिशय चांगल्या प्रकारे वापरता येईल या दृष्टीने मुलत: विभाजन हे अपरिहार्य आहे, ते कसे करावयाचे याच्या बद्दलची जी तात्विक चर्चा आहे किंवा जी प्रशासकीय मांडणी आहे, त्यासाठी एवढा वेळ लागावयास लागला तर आपण आजच्या घडीला या विज्ञान युगामध्ये तंत्रज्ञान वापरत असताना या सर्व गोष्टींचे निराकरण अतिशय कमी वेळेत होऊ शकते. जिल्हयाचे विभाजन कसे होईल, प्रशासकीय कार्यालये कोठे राहतील या गोष्टी आपल्याला सहजपणे करता येण्यासारख्या आहेत. एकदा इच्छाशक्ती पक्की असेल तर या बाबतीत निर्णय घेण्यास अधिक विलंब लागण्याचे काहीही कारण आम्हाला तरी समोर दिसून येत नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या बाबतचा निर्णय तत्काळ घ्यावा जेणे करुन त्या जिल्हयातील सगळया नागरिकांना चांगला दिलासा मिळू शकेल. या दृष्टीने प्रयत्न केला जाणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : होय.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी म्हटले की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अंतुले साहेबांनी जिल्हा विभाजनाचे काम केलेले आहे. त्यावेळी या राज्यात आघाडीचे सरकार होते. माननीय श्री.अंतुले साहेब हे कोकणातील आहेत. त्यात ते रायगड जिल्हयातील रहिवाशी आहेत. त्यांचे नेतृत्व अतिशय दमदार होते. मला असे वाटते की, हा विभाजनाच्या प्रश्नावर चर्चा करुन सभागृहाचा वेळ घालविण्यात काही अर्थ नाही. ठाणे जिल्हयाचे विभाजन का होत नाही याची खरी कारणे प्रत्येकाला माहिती आहेत. या जिल्हयातील आदिवासी मच्छीमार जनतेला मूर्ख बनवत राहू असे समजण्याचे कारण नाही. ठाणे जिल्हयाच्या विभाजनाच्या बाबतीत आमच्यामध्ये काही तात्विक मतभेद आहेत.

यानंतर श्री. भोगले...

अग्रधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.42089........ श्री.विनोद तावडे.....

त्याकरिता शासनाकडे निधी नाही, परंतु निवडणुकीसाठी सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना देण्यासाठी निधी आहे, कारण निवडणुका जिंकायच्या आहेत. मात्र जिल्हा विभाजनाच्या कामासाठी शासनाकडे निधी नाही. शासनाकडून ठाणे जिल्हयातील आदिवासी आणि मच्छीमार लोकांची फसवणूक केली जात आहे. आघाडी सरकारमधील दोन प्रमुख पक्षांमध्ये तात्विक क्लॅरिटी आल्यानंतर ठाणे जिल्हयाचे विभाजन केले जाईल असे जाहीर केले तर ते लोकांना आवडेल. या प्रश्नामध्ये राजकारण करु नये. ठाणे जिल्हयातील लोकांना जिल्हा विभाजनाबाबत शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या भूमिकेचा वीट आला आहे. या प्रश्नाबाबत सरकारमध्ये एकमत करुन पुढील महिन्याभरात निर्णय घेऊ असे जाहीर करण्यात यावे.

सभापती महोदय, या प्रश्नाबाबत माननीय श्री.शरद पवार किंवा कॉंग्रेस पक्षाचे प्रभारी श्री.मोहन प्रकाश यांच्यासमवेत बैठक घेतली तरी आमची हरकत नाही. परंतु आदिवासी जनतेची फसवणूक थांबविण्यात यावी. माननीय श्री.मधुकरराव पिचड आदिवासी मंत्री झालेले आहेत. त्यांनी या प्रश्नाबाबत आपली ताकद पणाला लावावी. कारण ते आदिवासी विकास मंत्री आहेत आणि श्री.भास्कर जाधव हे कोकणाचे प्रतिनिधित्व करणारे असून ते राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष झालेले आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षात या प्रश्नाबाबत एकमत तयार करुन पुढील दोन महिन्यात निर्णय घेऊ असे मंत्री महोदय जाहीर करतील काय?

श्री.बाळासाहेब थोरात : या प्रश्नाच्या अनुषंगाने कोणताही राजकीय वाद नाही. काही मूलभूत प्रश्न आहेत, अडचणी आहेत त्याबाबत चर्चा करता येईल. माननीय आदिवासी विकास मंत्री यांची मदत घ्यावी असे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सूचित केले आहे. निश्चितपणे त्यांची मदत घेऊ आणि लवकरच ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्याबाबत निर्णय घेऊ.

----------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे आंबेघर, काहेर (ता.पाटण, जि.सातारा) येथे वन खात्याच्या जागेमध्ये पवनचक्की उभारण्यात येत असल्याबाबत**

**(२) * ४३०४१ श्री.दिवाकर रावते , डॉ.दीपक सावंत** : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आंबेघर, काहेर (ता.पाटण, जि.सातारा) येथे बेकायदेशीररित्या वन खात्याच्या जागेमध्ये पवनचक्की उभारण्यात येत असल्याचे माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेकायदेशीर उभारण्यात येत असलेल्या पवनचक्क्यासंदर्भात स्थानिक ग्रामस्थांनी स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये रितसर तक्रार करुनही अद्याप कोणती कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले,
(४) तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही. पोलीस अधीक्षक, सातारा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार याबाबत पोलीस स्टेशन येथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरामध्ये शासनाला दुरुस्ती करावयाची आहे काय? या प्रश्नाशी गृहखात्याचा सुध्दा संबंध आहे. उत्तरामध्ये म्हटले आहे की, वन खात्याच्या जमिनीवर पवनचक्की उभारलेली नाही. जर वन खात्याच्या जमिनीवर पवनचक्की आढळून आली तर त्या संदर्भात हक्कभंग प्रस्ताव आणण्याचा माझा अधिकार मी राखून ठेवतो.

सभापती महोदय, पवनचक्की उभारण्याकरिता सातारा जिल्हयामध्ये शेतकऱ्यांवर अत्याचार केले जात आहेत. त्यांच्या शेतामधून जबरदस्तीने वाहने नेली जात आहेत. माझ्या शेतातून वाहन का नेले जात आहे अशी विचारणा केली तर संबंधित शेतकऱ्याविरुध्द कंपनीच्या वतीने पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल केली जाते. एका माजी पोलीस अधिकाऱ्याची कंपनीने नेमणूक केली आहे. शेतकऱ्यांचे मोबाईल फोन हिसकावून घेतले जातात. श्रीमती पद्मा कदम नावाच्या पोलीस अधिकारी आहेत त्या अधिकृतपणे कंपनीकडून हप्ता घेऊन गरीब गावकऱ्यांची छळवणूक करीत आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांच्या सातारा जिल्हयातील गरीब शेतकऱ्यांना न्याय मिळत नसेल तर

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४३०४१....... श्री.दिवाकर रावते......

राज्यातील सर्वसामान्य जनतेला न्याय कोण मिळवून देणार? मंत्री महोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची नाही असे दिसते. बेकायदेशीर उभारण्यात येत असलेल्या पवनचक्क्यांबाबत स्थानिक ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यामध्ये रितसर तक्रार करुनही अद्याप कोणती कारवाई करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय? या प्रश्नाबाबत 'प्रश्न उद्‌भवत नाही' असे उत्तर देण्यात आले आहे. पोलीस अधीक्षक, सातारा यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार याबाबत पोलीस ठाणे येथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही असे उत्तरामध्ये नमूद केले आहे.

सभापती महोदय, मी स्वत: पोलीस अधीक्षकांची भेट घेतली होती. श्रीमती पद्मा कदम या महिला पोलीस अधिकारी आहेत, त्यांच्याकडून स्थानिक महिला व गावकऱ्यांचा छळ केला जात आहे, त्यांना तुरुंगात डांबले जात आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली होती. सर्वोच्च न्यायालयाने काय म्हटले आहे? "Considering all these facts, there appears to be a substance in the allegations of the Applicant that the complaint file against them is false complaint."

नंतर ई.१....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :43041** ......

श्री. दिवाकर रावते ....

पोलीस आणि महसूल विभागाचे अधिकारी पवन चक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून पैसे खावून त्यांना मदत करीत आहेत. या ठिकाणी रस्ता नसतांना शेतकऱ्यांच्या जमिनीतून मोठ मोठी यंत्रे घेऊन जात आहेत. या ठिकाणी मी स्वत: भेट दिलेली आहे तसेच या ठिकाणचे फोटो सुध्दा माझ्याकडे आहेत. तेथील लोकांच्या जमिनी कशा हिसकावल्या जातात याचे फोटो आहेत. या ठिकाणच्या लोकांना पोलीस स्टेशनमध्ये फरफटत नेले जाते,गावकऱ्यांना तुरुंगात टाकले जाते. या घरातील जी मंडळी मुंबईत नोकरीला आहेत ती मंडळी गावी गेल्यानंतर त्यांना तुरुंगात टाकले जाते. तुरुंगात टाकल्यामुळे या लोकांच्या नोकऱ्या सुध्दा गेलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या जिल्हयामध्ये तरुणांच्या नोकऱ्या केवळ पवन चक्कीच्या कंपनीला फेव्हर करण्यासाठी गेलेल्या आहेत. असे असतांना माननीय मंत्री महोदय सांगतात की, प्रश्न उद्‌भवत नाही. या प्रश्नाची सर्वोच्च न्यायालयाने नोंद घेतलेली असतांना सुध्दा प्रश्न उद्‌भवत नाही ?

या ठिकाणी मी सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ दिलेला आहे. कंपनीच्या वकिलाने जे काही सांगितले आहे ते सर्व चुकीचे आहे. पाटण तालुक्यातील शेतकऱ्याची छळवणूक हे शासन करीत आहे. या प्रश्नाशी वन खात्याचा आणि गृह विभागाचा संबंध येतो त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर वन विभाग आणि गृह खात्याकडून येण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री बसलेले होते परंतु हा प्रश्न सुरु झाल्यानंतर ते सभागृहातून निघून गेले. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर कोण देणार आहे ? वन विभाग म्हणणार या प्रश्नाशी आमचा काही संबंध नाही. तेथील लोकांची पोलिसांकडून छळवणूक होत आहे हे उच्च न्यायालयाने सुध्दा मान्य केलेले असतांना या प्रश्नाच्या संदर्भात प्रश्न उद्‌भवत नाही असे म्हणणे म्हणजे या सदनाचा अवमान आहे. जर सरकारकडून या सदनाचा अवमान होणारी बाब नोंदली जाणार असेल तर ते योग्य नाही. त्यामुळे मी सुरुवातीलाच या प्रश्नामध्ये दुरुस्ती करावयाची आहे का असे विचारले असता माननीय वन मंत्र्यांनी नाही म्हणून सांगितले होते. हा प्रश्न गृह खात्याशी असल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी विनंती आहे. पद्‌मजा कदम या अधिकारी पवन चक्कीच्या कंपनीकडून पैसे खावून गावकऱ्यांना छळत आहेत असा मी अधिकृतपणे सभागृहात आरोप केलेला आहे.

**उप सभापती** : हा प्रश्न मी राखून ठेवतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :43041** ......

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, वन विभागाच्या संदर्भात मी उत्तर देण्यास तयार आहे.

**उप सभापती** : ठीक आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी पाटण तालुक्यातील प्रश्नाच्या संदर्भात या ठिकाणी माहिती दिलेली आहे. या ठिकाणचा प्रश्न आंबेघर, काहेर या दोन गावासंबंधीचा आहे. या दोन गावामध्ये पवन चक्कयांना कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही. पवन चक्कीला परवानगी देण्याचे काम मेढा करीत असते. मेढाकडून रिपोर्ट आल्यानंतर त्याला केंद्र सरकार मान्यता देत असते. या दोन गावांमध्ये खाजगी वनामध्ये तसेच वन विभागाच्या जागेवर कोणत्याही प्रकारच्या पवन चक्कीला परवानगी देण्यात आलेली नाही. या विषयाच्या संदर्भात मेढाने कोणतीही परवानगी दिलेली नाही तसेच वन खात्याने कोणत्याही प्रकारची एनओसी दिलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी असे सांगितले आहे की, आंबेघर येथे वाद निर्माण झालेले असून त्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी दिलेल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात वन विभागाच्या जागेमध्ये किंवा खाजगी वनामध्ये एकाही पवन चक्कीला मेढाने परवानगी दिलेली नाही आणि वन खात्याने कोणत्याही प्रकारची एनओसी दिलेली नाही तसेच केंद्र सरकारनेही त्याला परवानगी दिलेली नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वन खात्याची परवानगी न घेता या ठिकाणी पवन चक्क्या उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल करण्यात आलेली आहे. त्यामुळे वन खात्याच्या माध्यमातून या ठिकाणी झाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली होती काय ? किती झ ाडे तोडण्याची परवानगी देण्यात आली होती व प्रत्यक्षात किती झाडे तोडली गेली ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आंबेघर आणि काहेर या दोन गावामध्ये कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात आलेली नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रत्यक्षात त्या ठिकाणी भेट दिली होती. या ठिकाणचे फोटोही त्यांनी सोबत आणलेले आहेत. या सभागृहाच्या प्रथा व परंपरे नुसार जर एखाद्या सदस्याने स्वत: माहिती दिली असेल व ती माहिती वस्तुनिष्ठ असेल तर ती गृहीत धरली जाते. सन्माननीय सदस्य प्रत्यक्ष त्या जागेवर जाऊन आलेले आहेत त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय फेर चौकशी करतील काय ? ..3..



SGJ/ D/ MMP/ प्रथम श्री. भोगले....... 11:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :43041 ......**

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जी माहिती आणलेली आहे त्याची फेर तपासणी करण्यात येईल व त्यासंदर्भात योग्य तो निर्णय आठ दिवसाच्या आत किंवा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर घेण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.43041...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर प्रश्न हा गृह विभागाशी संबंधित असल्यामुळे आपण तो राखून ठेवला आहे काय ? हा प्रश्न राखून ठेवण्यात येईल असे आपण जाहीर केले आहे. वन विभागाशी जेवढा मुद्दा होता त्यासंबंधी माननीय वने मंत्र्यांनी उत्तर दिले आहे.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न गृह विभागाकडे गेलाच नाही. या प्रश्नासंबंधी माननीय मंत्र्यांनी माहिती घेऊन सन्माननीय सदस्यांना द्यावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निदान या प्रश्नासंबंधी आपण आपल्या दालनात बैठक बोलवावी. या संबंधी सर्वोच्च न्यायालयाने देखील आपले मत व्यक्त केले असताना शासन म्हणते की, आमचा यात काहीच संबंध नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. मी माझ्या दालनात बैठक घेतो. सदर बैठक कधी घ्यावी हे आपण मला सांगावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आठ दिवसामध्ये आपण बैठक घ्यावी.

**उप सभापती** : यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी माहिती घेतल्यानंतर मी लगेच बैठक घेतो.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील बंद पडलेली वसतिगृहे इतर संस्थांना चालविण्यास दिल्याबाबत**

**(3) * 42477 श्री.संदिप बाजोरिया , श्री.किरण पावसकर , श्री.दिपकराव साळुंखे-पाटील , श्री.हेमंत टकले , श्री.नरेंद्र पाटील , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी खाजगी संस्थांना चालविण्यासाठी देण्यात आलेली व नंतर बंद पडलेली वसतिगृहे इतर संस्थांना चालविण्यासाठी मिळावीत यासाठी सन 2008 मध्ये शासनाने 145 वसतिगृहांसाठी अर्ज मागविले होते, हे खरे आहे काय,

(2) तसेच ज्या संस्थेने अर्ज केले नव्हते व स्थानिक संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांची शिफारसही केली नव्हती अशा 20 वसतिगृहांना मान्यता दिली, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या संदर्भात शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.संजय सावकारे**, **श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) व (3) नाही.

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीयांच्या वसतीगृहांना मान्यता आणि सहाय्यक अनुदान या योजनेअंतर्गत असलेल्या अनुदानित वसतीगृहांपैकी बंद असलेली अनुदानित वसतीगृहे इतर संस्थांना हस्तांतरित व स्थलांतरित करुन देणेबाबत शासनाने वेळोवेळी पत्रे पाठवून अहवाल मागविलेले होते. त्यानुसार संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले होते.

त्यानुसार शासनाने सन 2008-09 व 2009-10 अखेर पर्यंत 145 बंद अनुदानित वसतीगृहे इतर संस्थांना हस्तांतरित व स्थालांतरित केले आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

लेखी प्रश्न क्रमांक 2 ला "नाही" असे उत्तर असून प्रश्न क्रमांक 3 ला विस्तृत उत्तर देण्यात आले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42477..

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, राज्यातील बंद पडलेली वसतिगृहे इतर संस्थांना चालविण्यास दिल्याबाबतचा प्रश्न आहे. राज्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी खाजगी संस्थांना चालविण्यासाठी देण्यात आलेली व नंतर बंद पडलेली वसतिगृहे इतर संस्थांना चालविण्यासाठी मिळावीत यासाठी सन 2008 मध्ये शासनाने 145 वसतिगृहांसाठी अर्ज मागविले होते, हे खरे आहे काय, असा प्रश्न विचारला असता त्याच आपण "होय" अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. 145 वसतिगृहांसाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यापैकी 20 वसतिगृहे किरकोळ संस्थांना चालविण्यात देण्यात आली आहेत. या संस्थांनी या वसतिगृहांसाठी अर्ज देखील केले नव्हते. एवढेच नव्हे तर स्थानिक अधिकाऱ्यांनी शिफारस देखील केली नव्हती. आपण तिसऱ्या प्रश्नाला त्यानुसार शासनाने सन 2008-09 व 2009-10 अखेर पर्यंत 145 बंद अनुदानित वसतीगृहे इतर संस्थांना हस्तांतरित व स्थालांतरित केले आहेत, अशा प्रकारचे लेखी उत्तर दिले आहे. आपण 20 संस्थांना नियमाबाह्य पद्धतीने वसतिगृहे चालविण्यास दिलेली आहेत. ज्या अधिकाऱ्याने ही परवानगी दिलेली आहे त्या अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? या प्रश्नासंबंधी कारवाई करण्यासंबंधीचा प्रश्न उद्‌भवत नाही असे नमूद केले आहे. जामगाव येथील वसतिगृह चालविणाऱ्या जय कालिमाता शिक्षण प्रसारक मंडळाने या विरोधात न्यायालयामध्ये न्याय मागितलेला आहे. ही परिस्थिती सत्य असेल तर त्यावर आपण अपात्र संस्थांना वसतिगृह चालविण्याची परवानगी दिलेली आहे असा अर्थ होतो. यात आपण पात्र संस्थांना वगळलेले आहे. तेव्हा या विषयी शासन सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करणार आहे काय ?

श्री.संजय सावकारे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जेवढी वसतिगृहे बंद पडली होती त्यासाठी शासनातर्फे जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मार्फत अर्ज मागविण्यात आले होते. त्यांच्याकडून अर्जांची छाननी केल्यानंतरच वसतिगृहांचे वाटप झालेले आहे. त्यामुळे यामध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडलेला नाही.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42477..

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, त्यानुसार शासनाने सन 2008-09 व 2009-10 अखेर पर्यंत 145 बंद अनुदानित वसतीगृहे इतर संस्थांना हस्तांतरित व स्थालांतरित केली आहेत. त्यासंबंधी माझा पहिला प्रश्न असा आहे की, बंद अनुदानित याचा अर्थ काय आहे ? याचे कारण असे आहे की, बंद संस्थांना आपण अनुदान देऊ शकत नाही. त्यामुळे या संस्थांची आपण कधी पाहणी केली होती ? आपण अंध विद्यार्थ्यांसाठी देखील वसतिगृह चालवितो. त्यासंबंधी देखील माहिती निदर्शनास आली आहे की, मुंबईतील वरळी येथील अंध विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची अतिशय दूरवस्था झाली आहे. तेथील विद्यार्थ्यांचे अतोनात हाल होत आहेत. तेव्हा अशी वसतिगृहे दुसऱ्यांकडे सोपविण्यासंबंधी आपण धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी अनुदानित अपंग, व्हीजेएनटी यांच्या वसतिगृहासंबंधी प्रश्न विचारला आहे. सदर वसतिगृहे व्यवस्थित चालत नसतील तर दुसऱ्या सक्षम संस्थांना नियमाप्रमाणे चालविण्यासाठीचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42477....

श्री. शिवाजीराव मोघे...

सन्माननीय सदस्यांनी अंध विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात आज संध्याकाळ पर्यंत चौकशी रिपोर्ट येईल. जर ती संस्था दोषी असेल तर त्या संस्थेकडून ते वसतिगृह काढून दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरित करण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, 145 बंद अनुदानित वसतिगृहे इतर संस्थांना हस्तांतरित व स्थलांतरित केले असल्याचे लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. माझा प्रश्न आहे की, पोहरादेवी, ता. मनोरा, जिल्हा वाशिम येथील किसनगाव संस्था अनुदानित वसतिगृह चालवित होते. माजी मुख्यमंत्री कै.वसंतराव नाईक यांच्या सहकार्यामुळे ते हायस्कूल आणि वसतिगृह सुरळीत सुरु होते. संस्थेच्या अंतर्गत भांडणामुळे ते वसतिगृह बंद पडले होते. परंतु आता ते सुरळीतपणे सुरु आहे. त्या संस्थेने वसतिगृह पुन्हा सुरु करण्याची रीतसर मागणी केलेली आहे. तेव्हा आपण त्या संस्थेला वसतिगृह पुन: सुरु करण्याची परवानगी दिली आहे काय, नसेल तर त्याची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, एखादे वसतिगृह संस्थेच्या अकार्यक्षमतेमुळे बंद पडल्यानंतर ते वसतिगृह पुन्हा सुरु करण्याची परवानगी आपण देत नाही. सर्वसाधारण पध्दती अशी आहे की, एखाद्या वसतिगृहाबद्दल तक्रार आल्यानंतर त्याबाबत आयुक्त चौकशी करुन ते वसतिगृह सुरु किंवा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेतात. जर बंद ठेवण्याचा निर्णय झाला असेल तर त्या संस्थेला मंत्री महोदयांकडे अपील करता येते. परंतु संस्थेच्या अकार्यक्षमतेमुळे बंद झाले असेल तर त्या संस्थेला ते वसतिगृह पुन्हा सुरु करण्याची परवानगी देत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन 2010-2011, 2011-2012 आणि 2012-2013 या तीन वर्षात राज्यात किती वसतिगृहे बंद पडली, बंद पडलेल्या वसतिगृहांबाबत काय कार्यवाही केलेली आहे ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42477....

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मला येथे सांगण्यात आनंद होतो की, जी अनुदानित वसतिगृहे बंद पडतील मग ती वसतिगृहे मुलांची असोत की मुलींची असोत, यातील फक्त मुलींची वसतिगृहे हस्तांतरित होतील असा महत्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याचे कारण असे की, एकूण 2388 वसतिगृहांपैकी मुलींची वसतिगृहे फक्त 550 होती. मागील दोन वर्षात 24 वसतिगृहे हस्तांतरित केलेली आहेत आणि ती मुलींची वसतिगृहे आहेत.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.भारवि.. 11:30

**राज्याच्या वार्षिक योजनेत अनुसूचित जाती व जमातीसाठी 500 कोटी रुपयांचा निधी रस्ते विकासासाठी वळविल्याबाबत**

**(4) * 42837 श्री.सुभाष चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.सतीश चव्हाण , डॉ.निलम गोऱ्हे , श्री.संजय दत्त , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती अलका देसाई , डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्याच्या सन 2013-14 या वार्षिक योजनेतील अनुसूचित जाती व जमातींसाठी राखून ठेवलेला 500 कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला रस्त्याच्या कामासाठी देण्यात आल्याचे माहे मे, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(2) तसेच, सन 2006 मध्ये केंद्रीय नियोजन आयोगाने प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक निर्देशामध्ये दलित आदिवासीचा निधी पाटबंधारे प्रकल्प, उर्जा प्रकल्प, राष्ट्रीय व राज्य महामार्गाला वापरता येणार नाही अशा सूचना नमूद केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(3) असल्यास, अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव ठेवण्यात आलेला निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्याची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय सावकारे, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता** : (1) राज्याच्या सन 2013-14 या वार्षिक योजनेतील अनुसूचित जाती उपयोजनेसाठी वाटप केलेल्या नियतव्ययापैकी रु.476.00 कोटी व आदिवासी उपयोजनेसाठी वाटप केलेल्या नियतव्ययापैकी रु.415.33 कोटी सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांना उपलब्ध करुन देण्याचे मा.मंत्रिमंडळ उपसमितीने निर्देशित केल्याचे नियोजन विभागाने कळविले आहे. परंतु अनुसूचित जाती उपयोजनेतून तसेच आदिवासी उपयोजनेतून सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांना नियतव्यय वाटप अद्याप केले नाही.

(2) होय.

(3) राष्ट्रीय नियोजन आयोगाच्या सन 2006 च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42837...

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, अनुसूचित जाती व जमातीसाठी राज्य शासनाच्या वार्षिक योजनेतून 10.9 टक्के निधी राखून ठेवण्याची तरतूद असताना तसेच हा निधी अनुसूचित जाती व जमातीच्या विकासासाठी वापरावा असे नियोजन आयोगाचे बंधन असताना निधी अन्य विभागासाठी खर्च करण्यासाठी निर्देश कसे दिले ? तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांच्या काळात देखील असाच प्रकार घडला होता. त्यावेळी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या 42 आमदारांनी त्यास कडाडून विरोध करुन तो प्रकार हाणून पाडला होता. मी अनुसूचित जातीच्या लोकांचे प्रतिनिधीत्व करतो. माझी विधानपरिषदेवर 2008 मध्ये नियुक्ती झ ाली. माझ्या पहिल्याच अर्थसंकल्पाच्या भाषणात मी म्हणालो होतो की, " खबरदार, या निधीला स्पर्श कराल तर " सामाजिक न्याय विभागाचे मंत्री सक्षम असताना या निधीला स्पर्श कसा करण्यात आला ? केंद्रीय मंत्री शैलजा यांनी सांगितले आहे की, मागासवर्गीच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून दिला जाणारा निधी त्याच विभागासाठी वापरावा म्हणून केंद्र सरकार कायदा करीत आहे. त्याबाबत राज्य शासनाने पाठपुरावा केलेला आहे काय, त्या संदर्भात केंद्र शासनाला काही सूचना केलेल्या आहेत काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा गैरसमज झालेला आहे. या विभागासाठी असलेला निधी अन्य विभागासाठी वापरलेला नाही आणि तसे उत्तरामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे. सन 2006 मध्ये केंद्रीय नियोजन आयोगाने निधी वाटपाबाबत निकष ठरवून दिलेले आहेत. त्या निकषानुसार राज्य शासन निधीचे वाटप करीत आहे. या विभागाचा निधी अन्य विभागाला देण्यात येत नाही.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात हे शासन निधी खर्च करते. या वर्षी 4 हजार 997 कोटी रुपये अनुदान मिळालेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अग्रेषित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42837....

श्रीमती अलका देसाई : माननीय मंत्र्यांचे उत्तर मी लक्षपूर्वक ऐकले आहे. या निमित्ताने मी निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, आदिवासी उप योजनेसाठी वाटप केलेल्या 476 कोटी रुपये निधीपैकी 415.33 कोटी रुपये सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांना उपलब्ध करुन देण्याचे मंत्रिमंडळाच्या उप समितीकडून मान्य करुन घेण्यात आले. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारते की, उप समितीचा निर्णय सभागृहातील चर्चेनुसार रद्द करुन तो निधी अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना उपलब्ध करुन देणार काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, या संदर्भात नियोजन आयोगाने जे सजेशन केले होते ते आपण मान्य केले नाही. कालच यासाठी पुरवणी मागणी केली आहे. त्यामुळे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून ग्रामीण दलित वस्ती सुधार योजनेसाठी 300 कोटी रुपये आणि नागरी दलित वस्ती सुधार योजनेसाठी 170 कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावित करण्यात आले आहेत.

श्री.विजय गिरकर : महोदय, 2006 मध्ये निर्देश दिले असताना सुध्दा केंद्र सरकारचा निधी कॉमन वेल्थ गेमसाठी वापरला होता. केंद्र सरकारने निर्देश दिलेले असताना अनुसूचित जाती/जमातीचा निधी सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यांनी वापरावा असे मंत्रिमंडळाची उप समिती कसे सुचवू शकते, तसेच हा निधी 2013-14 च्या अर्थसंकल्पात राखून ठेवला आहे असे उप समिती कसे सुचवू शकते ? या निमित्ताने मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाला उपलब्ध करुन दिलेले 415 कोटी 33 लाख रुपये अनुसूचित जाती व जमातीसाठीच खर्च करण्यात येतील काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, या संदर्भात केंद्र सरकारचे निर्देश आहेत. हा निधी दलित वस्त्यांसाठी खर्च करावा म्हणून ग्रामीण दलित वस्ती सुधार योजनेसाठी 300 कोटी रुपये आणि नागरी दलित वस्ती सुधार योजनेसाठी 176 कोटी रुपये पुरवणी मागण्यांमध्ये प्रस्तावित केले आहेत.

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचे मी अभिनंदन करतो. गेल्या अधिवेशनात आम्ही याच विषयावर अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला होता. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी सरकारचे समर्थन करणारे भाषण केले होते. आता

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42837....

श्री.विनोद तावडे....

घडलेल्या प्रकारावरुन अनुसूचित जाती/जमातीसाठी राखीव असलेल्या निधीची कशी चोरी केली जाते हे त्यांना दिसून येईल. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड या विषयी सातत्याने प्रश्न मांडतात. त्याबद्दल त्यांचे कौतुक आहे. परंतु या सर्व प्रकारामुळे कदाचित त्यांचे डोळे उघडले असतील. असो.

महोदय, मंत्रिमंडळ उप समितीने अशा प्रकारचा बदल केल्याचे नियोजन विभागाने निदर्शनास आणून दिले आहे. तरी सुध्दा माननीय मंत्री सांगत आहेत की, असे काही घडले नाही. अनुसूचित जाती-जमातीसाठी राखीव असलेला निधी दुसऱ्या विभागाकडे वळविणाऱ्या मंत्रिमंडळ उप समितीच्या सदस्यांची नावे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मोठमोठ्या स्वरुपाची कामे केली जातात. मी अगोदरच स्पष्ट सांगितले आहे की, हा नियतव्यय त्या विभागाकडे गेला नाही. तो कोठे गेला हे देखील मी सांगितले आहे.

(विरोधी पक्षातील काही सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

श्री.विनोद तावडे : महोदय, मी माननीय मंत्र्यांना पुन्हा विचारु इच्छितो की, मागासवर्गीयांचा निधी लाटणारे मंत्रिमंडळ उप समितीतील सदस्य कोण आहेत ?

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्र्यांनी या प्रश्नाचे सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, असा प्रकार घडलेलाच नाही.

श्री.विनोद तावडे : महोदय, मंत्रिमंडळाच्या उप समितीने अनुसूचित जाती व जमातीसाठी राखीव असलेला निधी अन्य विभागाकडे वळविण्याबाबत निर्देशित केल्याचे नियोजन विभागाने कळविल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. तरी सुध्दा माननीय मंत्री असा प्रकार घडला नसल्याचे सांगत आहेत. मी पुन्हा एकदा विचारतो की, अनुसूचित जाती व जमातीचा निधी दुसऱ्या विभागाकडे वळविण्याचा किंवा लाटण्याचा प्रयत्न करणारे उप समितीतील सदस्य कोण आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, यातील एकही पैसा डायव्हर्ट झ ालेला नाही.

(विरोधी पक्षातील काही सदस्य उभे राहून एकत्रित बोलतात.)

नंतर श्री.बरवड....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 42837......

**उप सभापती** : यानंतर प्रश्न क्रमांक 42635 चर्चेला घेण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : आम्हाला मंत्रिमंडळ उपसमिती सदस्यांची नावे पाहिजेत.

श्री. संजय सावकारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. जरी मंत्रिमंडळ उपसमितीने सुचविले असले आणि कोणीही सुचविले असले तरी पैसे डायव्हर्ट केलेले नाहीत. आपण पुरवणी मागण्या मान्य केल्या त्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी जे सांगितले त्याप्रमाणे योग्य त्या ठिकाणीच पैसे डायव्हर्ट करण्यात आलेले आहेत.

श्री. विनोद तावडे : आम्हाला मंत्रिमंडळ उपसमिती सदस्यांची नावे सांगावीत.

श्री. संजय सावकारे : उपसमितीने सुचविले असले तरी आम्ही ते मान्य केलेले नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : ती मंत्रिमंडळाची उपसमिती होती. नावांचा आग्रह कशासाठी ? मी प्रश्न क्रमांक 42635 पुकारलेला आहे. यानंतर प्रश्न क्रमांक 41608 चर्चेला घेण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे सदस्य घोषणा देतात )

**उप सभापती** : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.42 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित झाली )

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही मघाशी तारांकित प्रश्न क्रमांक 42837 च्या अनुषंगाने मंत्री महोदयांना मंत्रिमंडळ उपसमितीच्या सदस्यांची नावे सांगण्याची मागणी केली होती. त्यांनी निदान ती नावे तरी आम्हाला सांगितली पाहिजेत.

**उप सभापती** : ठीक आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

**आदिवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रोसिड प्रोटीन पावडर आणि मायक्रोन्युट्रिन चिक्कीची खरेदी करण्याबाबत**

**(५) * ४२६३५ डॉ.दीपक सावंत , श्री.दिवाकर रावते , श्री.जयंत पाटील , ॲड.आशिष शेलार , श्री.विनोद तावडे , श्री. विजय गिरकर , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.संजय दत्त , श्री.नितीन गडकरी , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.प्रवीण पोटे पाटील , डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रोसिड प्रोटिन पावडर व मायक्रोन्युट्रिन चिक्की खरेदी करणे उचित होणार नाही असे लेखी अभिप्राय आदिवासी विकास आयुक्तांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास आयुक्तांचे अभिप्राय डावलून शासनाच्या आदिवासी विकास विभागाने ३७ कोटी रुपयांच्या खरेदी करण्याचे आदेश दिनांक २९ एप्रिल, २०१३ रोजी काढण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी विकास आयुक्त यांचा अभिप्राय डावलून हे आदेश काढण्याची कारणे कोणती आहेत,

(४) या खरेदीच्या आदेशाबाबत मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास यांनी ही खरेदी डावलून व गरज नसताना केली जात आहे असे मत व्यक्त केले आहे, हे खरे आहे काय ?

**श्री.राजेंद्र गावित, श्री.मधुकरराव पिचड यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) शासकीय आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रोसिड प्रोटिन पावडर व माक्रोन्युट्रिन चिक्की खरेदीबाबत दिनांक 29.4.2013 रोजी दोन स्वतंत्र शासन निर्णय काढण्यात आले होते. मात्र, त्यास दिनांक 14 जून, 2013 रोजी दोन स्वतंत्र पत्रांद्वारे स्थगिती देण्यात आली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी माझ्या एकाही प्रश्नाला लेखी उत्तर दिलेले नाही. मी प्रश्न असा विचारला होता की, आदिवासी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रोसिड प्रोटिन पावडर व मायक्रोन्युट्रिन चिक्की खरेदी करणे उचित होणार नाही असे लेखी अभिप्राय आदिवासी विकास आयुक्तांनी दिले होते काय ? या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. पुढील दोन्ही प्रश्नांनाही उत्तर दिलेले नाही. केवळ मोघम स्वरुपाचे, "स्थगिती देण्यात आली आहे" असे उत्तर दिलेले आहे. या खरेदीच्या पाठीमागे कोण आहे ? सन्माननीय श्री.मधुकरराव पिचड यांनी आता या खात्याचा पदभार स्वीकारलेला आहे. त्यामुळे त्यांनीच आता या खात्याला न्याय द्यावा. आदिवासी विकास आयुक्तांनी ही खरेदी करु नये, ही खरेदी उपयोगाची नाही असा अभिप्राय दिला होता आणि या खात्याच्या सचिवांनी त्या खात्यातून निवृत्त होण्यापूर्वी एक दिवस अगोदर खरेदीचा निर्णय घेतला. अशा प्रकारच्या चुकीच्या खरेदीची शासन उच्चस्तरीय चौकशी करणार आहे

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ D/

ता.प्र.क्र.42635....                                                  डॉ.दीपक सावंत....

काय ? या चिक्कीमध्ये खरोखरच प्रोटिन आहे काय याची तपासणी करावी. या घटकांची तपासणी केल्यानंतर खरेदीची शिफारस केली जाईल काय ?

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी उपस्थित केलेला प्रश्न सत्य आहे. या चिक्कीची खरेदी करणे उचित होणार नाही असा अभिप्राय आदिवासी विकास आयुक्तांनी पाठविला होता. असा अभिप्राय पाठविलेला असतानाही शासनाने खरेदीचा निर्णय घेतला होता. परंतु मी दिनांक 11 जून, 2013 रोजी मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर दिनांक 14 जून, 2013 रोजी या खरेदीला स्थगिती दिलेली आहे. येथून पुढेही अशा प्रकारची अनावश्यक खरेदी करण्यात येऊ नये.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ 11:50

ता.प्र.क्र.42635.... श्री. मधुकरराव पिचड...

ज्या गोष्टी खरेदी करावयाच्या आहेत त्यांची मुलांना आवश्यकता आहे की नाही यासंबंधी महिला व बालविकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्याकडून माहिती घेण्यात येईल. त्या विभागांची शिफारस असेल तरच भविष्यात अशा प्रकारची खरेदी करण्यात यावी अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. 29 तारखेला ऑर्डर दिली आणि 30 तारखेला ते अधिकारी निवृत्त झाले. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. मधुकरराव पिचड : कारवाई होईल.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील पानशेत पूरग्रस्त वसाहतीतील अस्तित्वात असलेली घरे नाममात्र प्रिमियम आकारुन नियमित करण्याबाबत**

**(६) * ४१६०८ श्री.मोहन जोशी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील पानशेत पूरग्रस्त वसाहतीतील अस्तित्वात असलेली घरे नाममात्र प्रिमियम आकारुन नियमित करावीत, ज्या गाळेधारकांनी बांधकाम केलेले नाही, त्यांच्याकडून नाममात्र प्रिमियम आकारुन अडीच एफएसआय द्यावा व गावठाणाची नियमावली लागू करावी अशी मागणी पूरग्रस्त नागरिकांकडून होत असल्याचे माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पानशेत पूरग्रस्तांच्या घरांच्या प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पतंगराव कदम** : (१) होय हे खरे आहे, पूरग्रस्त वसाहतींसाठी प्रिमियम आकारुन अडीच एफएसआय द्यावा व गावठाणाची नियमावली लागू करावी या मुद्यावर नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगरपालिकेने पुणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.
(२) व (३) शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मोहन जोशी : पुणे शहरातील पानशेत पूरग्रस्तांचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित होता. मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये माननीय पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम आणि माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी संयुक्त बैठक घेऊन पूरग्रस्तांच्या संदर्भात महत्वाचे निर्णय घेतले. या पूरग्रस्तांना 52 वर्षानंतर न्याय दिल्याबद्दल मी माननीय डॉ. पतंगराव कदम आणि माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांचे विशेष अभिनंदन करतो. एका मिनिटात निर्णय घेऊन झटपट काम करण्याची डॉ. पतंगराव कदम याची पध्दत आहे. त्याप्रमाणे त्यांनी या प्रकरणी त्वरित निर्णय घेतलेला आहे. जे पूरग्रस्त गाळेधारक असतील किंवा जे सोसायटीतील लोक असतील त्यांना मालकी हक्क देण्याचा निर्णय घेतला. तरीही 677 लोक रक्कम भरायचे राहिलेले आहेत. त्यांना रक्कम भरण्यासाठी 3 महिन्याची मुदत वाढवून घ्यावी अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. ज्या गाळेधारकांनी मूळ पूरग्रस्तांकडून अनधिकृतपणे गाळे विकत घेतलेले आहेत त्या गाळेधारकाकडून सुध्दा त्यांनी ज्या दिवशी गाळे विकत घेतले असतील त्या दिवसाच्या जमिनीच्या बाजारभावाच्या 50 टक्के रक्कम वसूल करुन त्यांच्या नावे मिळकतपत्रिका देण्यात येतील काय ? पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने एकमताने 2001 आणि 2007 सालामध्ये

..3..



MSS/ D/ MMP/ 11:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूरग्रस्तांना 2 एफएसआय देण्याचा ठराव केला करुन तो नगरविकास आणि नगररचना विभागाच्या अधिका-यांकडे पाठविण्यात आला. याबाबतीत माननीय मंत्री महोदय नगरविकास आणि नगररचना विभागाच्या अधिका-यांची बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावतील काय ?

डॉ. पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ज्यांनी पैसे भरलेले नाहीत त्यांना पैस भरण्यासाठी शेवटची तीन महिन्याची मुदत आजच्या तारखेपासून दिली जाईल. अशा प्रकारची मुदत त्यांना अनेक वेळा दिली गेली होती. तीन महिन्याच्या आत पैसे भरल्यानंतर त्यांना रेग्युलराईज करण्यात येईल. आधी ज्यांना मालकी हक्काने घरे दिली होती ती त्यांना 10 वर्षे विकता येत नव्हती.  आता ही मुदत 5 वर्षाची केलेली आहे. 5 वर्षानंतर त्यांना घरे विकता येतील. नगरविकास आणि नगररचना विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येतील.

श्रीमती दिप्ती चवधरी : पानशेत पूरग्रस्तांची एकूण संख्या किती आहे ? रेडिरेकनर दराप्रमाणे 10 लाख रु. भरण्यास सांगितलेले आहे. या रकमेमध्ये काही सूट देण्यात येईल काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 11:55

ता.प्र.क्र.41608.....

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, एकंदर पूरग्रस्त 3142 होते. त्यातील बाकीच्या पूरग्रस्तांनी पैसे भरले आहेत. 677 पूरग्रस्तांनी पैसे भरलेले नाहीत. म्हणून मी त्यांना शासनाच्या वतीने तीन महिन्यांची मुदत जाहीर करतो. त्यांनी पैसे भरल्यानंतर त्यांना नियमित केले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी माननीय पुनर्वसन व मदतकार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम यांचे अभिनंदन केले ते ठीक आहे. पूरग्रस्त आणि सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांची आत्मवंचना किंवा फसवणूक होते आहे की काय अशी मला शंका वाटते आहे. याचे कारण असे आहे की, उत्तरात म्हटले आहे की, "फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे." तो प्रस्ताव सादर करण्यात आला आहे काय, त्या प्रस्तावाच्या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे ? माझ्या माहिती प्रमाणे आपल्या बैठकीस पुणे महानगरपालिकेचे अधिकारी अनुपस्थित होते. या बाबतीत पुणे महानगरपालिकेने कोणत्या प्रकारची सकारात्मक भूमिका घेतली आहे ? मंत्री महोदय या ठिकाणी परत परत सांगत आहेत की, ज्यांनी पैसे भरलेले नाहीत, त्यांना मी तीन महिन्यांची मुदत दिली आहे. ज्यांनी पैसे भरलेले आहेत, त्यांना अधिकृत करण्याबद्दल धोरणात्मक निर्णय घेतला आहे. या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी पुणे महानगरपालिकेने संपूर्णपणे सहकार्य दिलेले आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, पुणे महानगरपालिकेकडे एफएसआय वाढविण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. त्या प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्या प्रस्तावास मान्यता मिळण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकेकडे पाठपुरावा करण्यात येईल.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, एमआरटीपी (37)खाली महानगरपालिकेने प्रस्ताव पाठवावा अशा प्रकारचे उत्तर आहे. शासन जर पूरग्रस्तांना न्याय देण्याच्या बाबतीत आग्रही असेल तर माझा प्रश्न एवढाच आहे की, एमआरटीपी (37) खाली महानगरपालिकेकडून प्रस्ताव येण्याऐवजी एमआरटीपी (154) खाली एफएसआय वाढीसाठी सरकार आदेश देईल काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, योग्य वेळी पुन्हा महानगरपालिकेला मुदत देऊ. तरी देखील त्यांनी प्रस्तावास मान्यता दिली नाही तर सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार करता येईल.

-------

2....

16-07-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) L-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील आदिवासींसाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येऊनही**

**आदिवासी योजनांपासून वंचित राहत असल्याबाबत**

**(७) * ४२१६३ श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.संजय दत्त , श्री.एम.एम.शेख , श्री.मोहन जोशी , डॉ.सुधीर तांबे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.नितीन गडकरी , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासींच्या उध्दारासाठी शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येत असूनही शासनाच्या योजनांपासून आदिवासी वंचित राहत असल्याचे माहे मे, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींसाठी सुमारे साडेतीनशे योजना असून त्यांचे एकत्रीकरण करण्याचा व त्या आदिवासीपर्यंत पोहचविण्याचा शासनाचा विचार असून याबाबत शासनाने आवश्यक ती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(३) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेंद्र गावित,श्री.मधुकरराव पिचड यांच्याकरिता** : (१), (२) व (३) आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेऊन मूल्यमापन करण्यासाठी १६ योजना यशदा, पुणे यांचेकडे व ७ योजना अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांचेकडे देण्यात आलेल्या आहेत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी आपले लक्ष प्रथम उत्तराकडे वेधू इच्छिते. उत्तरात असे नमूद केले आहे की, "(१),(२) आणि (३) आदिवासी उपयोजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेऊन मुल्यमापन करण्यासाठी १६ योजना यशदा,पुणे यांचेकडे व ७ योजना अर्थ व सांख्यिकी संचालनालय,मुंबई यांचेकडे देण्यात आलेल्या आहे." एका बाजूने असे सांगितले जाते की, आदिवासींच्या विकासाकरिता करोडो रुपये खर्च केले जातात. दुसरीकडे मात्र प्रत्यक्षात आदिवासी बांधवांना योजनांचा लाभ दिला जात नाही. योजनांचे मूल्यमापन यशदा आणि अर्थ सांख्यिकी संचालनालयाकडून करुन घेतले जाणार आहे. राज्यातील आदिवासींसाठी

३...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कोटयावधी रुपये खर्च करण्यात येऊनही आदिवासी बांधव हे योजनांपासून वंचित राहिलेले आहेत. हा निधी कोणासाठी खर्च केला गेला, कोणत्या कामांसाठी केला गेला याची माहिती सभागृहात दिली पाहिजे. हा निधी आदिवासी बांधवांवर खर्च केला गेला नसेल तर हा निधी कोठे खर्च करण्यात आला आहे, हा निधी खर्च झाला नसेल तर हा निधी कोठे गेला या बाबतची देखील माहिती सभागृहाला मिळाली पाहिजे. या सभागृहात नेहमी आदिवासी-आदिवासी म्हणून डांगोरा पिटला जातो, परंतु आदिवासी बांधवांच्या पदरात काहीही पडत नाही ही गंभीर बाब आहे. यावेळी आदिवासी समाजाचे प्रामाणिक मंत्री आदिवासी विकास विभागाला लाभलेले आहेत. मला त्यांना आवर्जून सांगावयाचे आहे की, कृपया माझ्या प्रश्नाच्या बाबतीत व्यक्तीश:लक्ष घालून आदिवासींना न्याय द्यावा.

श्री.मधुकरराव पिचड : सभापती महोदय, या राज्यात आदिवासी बांधवांचा विकास करण्यासाठी वेगळे बजेट असावे ही संकल्पना तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांनी मांडली. पहिला आदिवासी मंत्री मी निघालो की, या राज्यात आदिवासींसाठी वेगळे बजेट मांडले गेले. आदिवासींसाठी वेगळी तरतूद करण्यात येत आहे. या तरतुदीतून आदिवासींच्या विकासासाठी वेगवेगळया योजना आखतो. या योजना तयार करीत असताना जिल्हा नियोजनास ६० टक्के, राज्य स्तरावरील योजनांसाठी ४० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. आदिवासी विभागाच्या ७३ योजना आहेत. २१९ योजना डीपीडीसीच्या आहेत. राज्यातील १ कोटी ४ लाख आदिवासी बांधवांना या योजनांचा लाभ देण्यात येतो. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आश्रमशाळा चालविणे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना, ठक्करबाप्पा योजना, इंदिरा आवास, पारधी समाजाच्या योजना, अशा विविध योजना आदिवासी बांधवांसाठी आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.42163......... श्री.मधुकरराव पिचड......

सभापती महोदय, बेंचमार्क सर्व्हे होऊन आदिवासींच्या जीवनाची काय वस्तुस्थिती आहे, कोणत्या योजना आवश्यक आहेत याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. म्हणून यशदा आणि अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडे योजनांच्या मूल्यमापनाचे काम दिले आहे. बेंचमार्क सर्व्हे होऊन कोणत्या योजना योग्य आहेत, कोणत्या योजना राबविल्या जाव्यात याचा सर्वंकष विचार करणार आहोत. भविष्यात चांगल्या योजना सुरु ठेवून कालबाह्य योजना बंद करुन आदिवासी जनतेच्या हिताच्या योजना राबविण्याचे सरकारचे धोरण आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उत्तराखंड राज्यातील भीषण नैसर्गिक आपत्तीच्या वेळी भारतीय संरक्षण दलाच्या अधिकारी व जवानांनी केलेल्या साहसपूर्ण कामगिरीबद्दल अभिनंदन

**मु.शी.**: उत्तराखंड राज्यातील भीषण नैसर्गिक आपत्तीच्या वेळी भारतीय संरक्षण दलाच्या अधिकारी व जवानांनी केलेल्या साहसपूर्ण कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा उप सभापती यांचा प्रस्ताव

**उप सभापती** : उत्तराखंडातील भीषण नैसर्गिक आपत्तीत देशभरातून आलेले लाखो यात्रेकरु व नागरिक सापडले. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी होत असताना भारतीय संरक्षण दलातील अधिकारी, जवान, इंडो-तिबेटीयन बॉर्डरचे पोलीस यांनी स्वत:च्या प्राणाची पर्वा न करता मुसळधार पाऊस, दाट धुके व खराब हवामानाच्या प्रतिकूल परिस्थितीत लाखो भाविकांना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. उत्तराखंडातील संकटग्रस्तांच्या मदत कार्यात फार मोठे अडथळे येत होते. रस्ते, पूल महाप्रलयात उद्ध्वस्त झाल्यामुळे लाखो नागरिक व यात्रेकरुंचा संपर्क तुटला असताना हवाई दलाने हेलिकॉप्टरद्वारे मदत कार्य सुरु करुन मानवी साखळीद्वारे अनेकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले. भारतीय लष्करातील जवानांनी रात्रंदिवस त्या ठिकाणच्या वातारवणाशी संघर्ष करुन मदत कार्य मोठया धाडसाने सुरु ठेवले. एका हेलिकॉप्टरच्या दुर्घटनेत 20 जवान कामी आले, त्यात महाराष्ट्रातील शूरवीर शहीद जवानांचाही समावेश आहे.

देशाच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून रक्षण करणाऱ्या लष्करातल्या जवानांनी पुन्हा एकदा आपले साहस, धाडस आणि जिगर उत्तराखंडमध्ये महाभयंकर नैसर्गिक आपत्तीत दाखवून दिली आहे. निसर्ग कोपला तरी माणुसकीचा गहिवर आटला नाही हेच भारतीय जवानांच्या कृतीतून दिसून आले आहे. अतिशय कठीण परिस्थितीत भारतीय संरक्षण दलातील अधिकारी व जवान यांनी केलेल्या शौर्याची नोंद भारताच्या इतिहासात निश्चितच घेतली जाईल.

या महाप्रलयकारी अस्मानी संकटकाळात स्वत:च्या प्राणाची बाजी लावून मदत कार्य करणाऱ्या भारतीय संरक्षण दलातील अधिकारी आणि जवानांनी अत्यंत कठीण परिस्थितीत आणि प्रतिकूल हवामानामध्ये एक लाखापेक्षा अधिक यात्रेकरु व नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी केलेल्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.....

अतुलनीय शौर्याबद्दल सर्वांना रास्त अभिमान वाटतो. भारतीय जवानांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करणे उचित होईल. सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिदंन करतो.

अभिनंदनपर प्रस्ताव एकमताने संमत झाला.

----

नंतर एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्याबाबत**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याच्याचा मुद्दा आहे. उत्तराखंड मध्ये सैनिकांनी लाखो भाविकांचे प्राण वाचविल्यामुळे सैनिकांच्या अतुलनीय कार्याचा आपण काल गौरव केल्याबद्दल आम्हा सर्वांना त्याबद्दल अभिमान आहे. अतुलनीय धैर्य गाजविणाऱ्या सैनिकांच्या संदर्भात या सदनात जो अवमान झालेला आहे त्यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, जगाला थक्क करेल अशा प्रकारचे काम उत्तराखंड मध्ये झालेल्या महाप्रलयामध्ये आपल्या सैनिकांनी करुन दाखवले आहे. 8 ते 9 दिवसामध्ये 1 लाखापेक्षा अधिक यात्रेकरुंचे प्राण सैनिंकानी वाचवलेले आहेत. हेलिकॉप्टरमध्ये एका वेळेस 8 ते 10 लोक येऊ शकतात त्यावेळेस हवामान सुध्दा खराब होते. यात्रेकरुंना जीवंत ठेवण्याचे तसेच अन्न,पाणी पोहचवण्याचे काम सैनिकांनी केलेले आहे. दिवसाचे नियोजन करुन एका दिवसामध्ये मी जास्तीत जास्त किती यात्रेकरुना वाचवू शकतो, तसेच जे यात्रेकरु अडकून पडलेले आहेत त्यांना जास्तीत जास्त अन्न, पाणी पुरवून त्यांच्यामध्ये जगण्याची आशा निर्माण करण्याचे अतुलनीय काम आपल्या सैनिकांनी केलेले आहे. सैनिकांचा गौरव व्हावा यासाठी आम्ही आग्रही होतो. आमच्या भावनांचा आदर करुन या ठिकाणी सर्वांच्या वतीने आपण प्रस्ताव मांडला त्याबद्दल मी आपले आभार मानतो. देशातील नागरिकांवर आपत्ती येते त्यावेळेस सैनिक अशा प्रकारचे काम करीत असतात अशा प्रकारची भावना या ठिकाणी व्यक्त करण्यात आली.

सभापती महोदय, या सदनामध्ये काल उत्तराखंड मध्ये जे जवान शहीद झाले तसेच नैसर्गिक आपत्तीमध्ये ज्यांचा मृत्यू झालेला आहे त्यांच्या संदर्भात या ठिकाणी शोक प्रस्ताव मांडला गेला होता. हा प्रस्ताव अत्यंत सन्मानाने मांडला गेला होता. परंतु माझ्यातला जातीयवाद जागा झाला तर तो मला सांगितलाच पाहिजे अशा अविर्भावामध्ये,या सभागृहामध्ये माननीय मंत्रीमहोदया उभ्या राहिल्या. माननीय मंत्री महोदयांना सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्याचा अधिकार आहे. शहीद झालेल्या जवानांना तसेच कै.दि.बा.पाटील यांना आदरांजली वाहण्यासाठी त्या उभ्या राहिल्या असाव्यात असा आमचा समज झाला होता. परंतु दुर्दैवाने त्यांना दि.बा.पाटील कोण होते हे माहिती नसल्यामुळे त्यांना श्रध्दांजली वाहण्याचा प्रश्नच आला नाही.

सभापती महोदय, दुसऱ्याला जातीयवादी ठरवित असतांना माझ्यातील मुस्लीम जातीयवाद गप्प बसू देण्यास तयार नाही म्हणून माननीय मंत्री महोदयांनी या सदनात असे सांगितले की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

"अनेक मुस्लीम संघटनांनी यासंदर्भात पैसे जमा करुन मदत केलेली आहे." मुस्लीम संघटनांनी या काळात मदत केली होती का यासंदर्भात मी अनेकांना विचारले होते. आपल्यालाही यासंदर्भातील माहिती असेल व ती माहिती दिली तर मला आनंद होईल. परंतु "माझ्या मुस्लीम बांधवानी मदत केली" हे सांगण्यासाठी जेव्हा मुस्लीम मंत्री उभा राहतो तेव्हा तो जातीयवाद नसतो ? मी याला जातीयवाद का म्हणतो हे मला येथे सांगावयाचे आहे. माननीय मंत्री महोदयांनी सैनिकांचा अपमान करणारे वक्तव्य या ठिकाणी केलेले आहे. त्यांनी सैनिकांच्या संदर्भात जे वक्तव्य केलेले आहे ते माझ्याकडे आहे. आपल्या सर्वांना शरमेने मान खाली घालावे लागेल अशा प्रकारचे वक्तव्य माननीय मंत्री महोदयांनी केलेले आहे. या विषयाच्या संदर्भात मी कालच विचार मांडणार होतो परंतु काल श्रध्दांजलीचा प्रस्ताव असल्यामुळे मी काल यांसदर्भात काही बोललो नाही.

माननीय मंत्री महोदयांनी काल या सभागृहात असे नमूद केले होते की, "उत्तराखंडमध्ये अडकलेल्या लोकांना वाचविण्यासाठी, त्यांची तेथून सुटका करण्यासाठी जेव्हा हेलिकॉप्टरची मदत घेण्यात येत होती त्यावेळेस असे सांगण्यात येत होते की, महाराष्ट्रामध्ये जातीयवाद आणि प्रांतवाद असल्यामुळे त्या राज्यातील लोकांना लवकर घेऊन जाऊ नका." त्या ठिकाणी मरणाने तडफडणारी लोक होते. त्या ठिकाणी जातीयवाद,धर्मवाद अजिबात नव्हता. त्या ठिकाणी सर्वच हिंदू होते. प्रत्येकाला आपण कसे जीवंत राहू याचाच प्रश्न पडला होता. त्या परिस्थितीत "तुम्ही काय करणार आहात, अडकलेल्यांना सोडविण्यासाठी तुम्ही का जात नाही ?" असे खवचट प्रश्न अनेकांनी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारले होते. त्यावेळेस मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, "तो भाग सैनिकांच्या ताब्यात दिलेला असल्यामुळे आम्हाला त्या ठिकाणी जाण्याची परवानगी नाही. सैनिकांनी यात्रेकरुंना आमच्या कँपमध्ये आणल्यानंतर त्यांना महाराष्ट्रात पोहचवण्याची जबाबदारी सरकारने घेतलेली आहे." त्या ठिकाणी जे लोक अडकले होते ते कोणकोणत्या भागातील होते हे त्यांनाच माहिती नव्हते. त्या परिस्थितीत तू युपीचा आहेस की, अजून कोठला आहे याची चौकशी कोण कशाला करेल ? उत्तराखंडमध्ये अडकलेल्यांना सैनिकांना वाचवले त्याबद्दल आपण त्या सैनिकांचा गौरव केलेला आहे. काल

या सदनात माननीय मंत्री महोदय; म्हणाल्या होत्या की,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यावेळी असे सांगण्यात येत होते की, "महाराष्ट्रात जातीयवाद आणि प्रांतवाद असल्यामुळे त्या राज्यातील लोकांना लवकर घेऊन जाऊ नका." एवढे मी समजू शकलो असतो. पण माननीय मंत्री महोदयांनी पुन्हा या सभागृहामध्ये अकलेचे तारे तोडून सभागृहाचा अवमान करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी पुढे असे म्हटले की, "भाषावाद आणि प्रांतवाद हे देशाच्या ऐक्याला हानीकारक आहेत." या सदनाला काही गरिमा आहे की नाही ? आम्ही श्रद्धांजली वाहण्याकरिता उभे असताना त्यांना मुसलमान आठवतो, त्यांना महाराष्ट्रातील प्रांतवाद आणि जातीयवाद आठवतो. याबाबतीत सैनिकांचा घोर अपमान झालेला आहे. हा महाराष्ट्रातील जनतेचा घोर अपमान झालेला आहे.

मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, अशा प्रकारे जातीयवाद पोसणाऱ्या मंत्र्यांचा ताबडतोब राजीनामा घेतला पाहिजे. महाराष्ट्राच्या सैनिकांचा, देशाच्या भावनेचा अवमान मंत्री या नात्याने सदनामध्ये करणे म्हणजे या सदनाचा अवमान आहे. त्यामुळे मी मागणी करतो की, या माननीय मंत्र्यांनी आपल्या पदाचा ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे. महाराष्ट्राचा अवमान आम्ही सहन करणार नाही, सैनिकांचा अवमान सहन करणार नाही. अन्यथा आपण मांडलेला ठराव परत घ्यावा अशा प्रकारची परिस्थिती आहे. मी अत्यंत नम्रपणाने हे सर्व सांगत आहे. माझ्या ह्या भावना आपण ताबडतोब माननीय मुख्यमंत्र्यांना कळवाव्यात आणि या माननीय मंत्र्यांनी या सदनामध्ये अशा प्रकारचे वक्तव्य करू नये. या सदनामध्ये येऊन महाराष्ट्राला अशा प्रकारचे हिणविण्याचे काम एका माननीय मंत्र्यांकडून होणार असेल तर त्यांना महाराष्ट्राच्या मंत्रीपदावर बसण्याचा अधिकार नाही, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, यासंबंधी आपण निर्णय द्यावा.

**उप सभापती** : मी सदनाला सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी येथे जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे तो मी स्वत: तपासून पाहतो आणि आपल्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालतो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : ही बाब अतिशय गंभीर असल्यामुळे मी गांभीर्याने घेतली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, काल त्यांना असे बोलण्याची आवश्यकता नव्हती. आपण ही बाब गांभीर्याने घेतली असेल तर मंत्री महोदयांचा आपण राजीनामा घ्यावा. माननीय मंत्री महोदया, संपूर्ण राज्याचा अवमान करीत आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. तो विषय आपण तपासून घेऊन केव्हा पर्यंत सभागृहाला अवगत करणार आहात हे देखील सांगणे आवश्यक आहे. हा विषय अतिशय गंभीर आहे.

**उप सभापती** : या संबंधी मी सभागृहाला दोन दिवसामध्ये अवगत करतो. आता आपण नियम 289 च्या प्रस्तावाला सुरूवात करू या.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**डान्स बार बंदीच्या विरोधात सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णया संबंधी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेवरील चर्चेला सुरूवात करण्यापूर्वी पॉईंट ऑफ इन्फमेर्शनद्वारे मी सुप्रीम कोर्टाच्या एका निर्णयाकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. आज सकाळी सुप्रीम कोर्टाने डान्स बार सुरू करण्यासंबंधी निर्णय दिलेला आहे. हा महत्त्वाचा निर्णय आहे. डान्सबार संबंधी सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला आहे. सुप्रीम कोर्टाने डान्स बार पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. यासंबंधी राज्य सरकारने आपली भूमिका मांडली नाही काय, असल्यास, कशा प्रकारे मांडली आहे, याबाबत सुप्रीम कोर्टाचे निदेश काय आहेत, या पुढे आपण काय करणार आहात इत्यादी सर्व माहिती सभागृहाला समजली पाहिजे.

................

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी औचित्याचा मुद्दा मांडताना माननीय मंत्री महोदय जे काही बोलले आहेत ते सभागृहाच्या निदर्शनास आणले आहे. माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे रेकॉर्डवर आलेले आहे. त्यामुळे आपण सभागृहाचे कामकाज तहकूब करावे अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विनंती आहे की,... (अडथळा) ..... मला एका गोष्टीचे स्पष्टीकरण करू द्यावे. .... (अडथळा) ..... मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, औचित्याचा मुद्दा मांडल्यानंतर आपण काही चुकीचे बोलला आहात असे मी बोललो नाही. उलट मी जबाबदारीने म्हटले की, आपण औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे..... (अडथळा) ........ मी काल सभागृहात होतो. शेवटी पीठासीन अधिकारी या नात्याने भूमिका घेताना मला सर्व रेकॉर्ड नीट तपासून पाहणे आवश्यक आहे हे देखील आपण लक्षात घ्यावे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकत्रित बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे..

**उप सभापती** : मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगितले होते की, मी ही बाब तपासून पाहीन आणि सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना माननीय मुख्यमंत्री महोदयांना नजरेस आणून देईन.

श्री.दिवाकर रावते : हा विषय गंभीर आहे. आपण आजचा अभिनंदनाचा प्रस्ताव मागे घ्यावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपण या संदर्भात निर्णय दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात सभागृहाचे कामकाज थांबविण्याचे काही कारण नाही. आपण सभागृहापुढील कामकाज पुढे सुरु करावे.

**उप सभापती** : मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.15 वाजता 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

--------

यांनतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी केलेल्या अयोग्य वक्तव्याबाबतचा मुद्दा मांडला होता. माझी सभागृहाला विनंती आहे की, माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी आपले वक्तव्य मागे घ्यावे. त्यांच्याकडून श्रध्दांजलीच्या भाषणामध्ये औचित्य भंग झाला आहे. वास्तविक पाहता श्रध्दांजली अर्पण करताना राजकीय विधाने केली जात नाहीत. आमची सर्वांची मागणी आहे की, माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे. तसेच माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी कालच्या वक्तव्याबाबत दिलगिरी व्यक्त करावी.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, काल शोक प्रस्तावाच्या वेळी माननीय राज्यमंत्री प्रा.फौजियाताई खान यांनी त्यांचे मत व्यक्त केले होते. माननीय राज्यमंत्र्यांचे वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे व त्यांनी दिलगिरी व्यक्त करावी अशी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मागणी केली आहे. माझी विनंती आहे की, माननीय राज्यमंत्री प्रा.फौजिया खान यांनी नेमके कोणते वक्तव्य केले हे प्रथम तपासून पहावे. त्यांचे वक्तव्य अयोग्य असेल तर आपल्याला पुढील निर्णय घेता येईल. मी नुकतीच त्यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, त्यांच्याकडून बाधा आणणारी कोणतीही बाब घडली नाही. तशा प्रकारची वाक्य रचना त्यांच्याकडून बोलली नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांचे कालचे संपूर्ण वक्तव्य तपासून घ्यावे. त्या बाबत तसे काही त्या बोलल्या असतील तर ते आपल्याही लक्षात येईल. सभागृहाचे कामकाज व्यवस्थित चालण्याच्या दृष्टीने आम्ही सकारात्मक भूमिका घेऊ. आम्ही अजिबात टोकाची भूमिका घेणार नाही ही बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.बरवड.....

**उप सभापती** : आता माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जे सांगितले त्याप्रमाणेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्यावेळी औचित्याच्या मुद्याव्दारे त्यांचे म्हणणे मांडले त्याचवेळी मी सांगितले की, मी ही सर्व बाब तपासून पाहीन आणि एक दोन दिवसात निर्णय घेऊन सभागृहाला अवगत केले जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण काय निर्णय दिलेला आहे ?

**उप सभापती** : मी या बाबतीत निर्णय दिलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण ही बाब तपासून घेणार आहात पण केव्हा पर्यंत तपासून घेणार ?

**उप सभापती** : मी दोन दिवस म्हणालो असलो तरी प्रत्यक्षात दोन दिवस घेणार नाही. दोन दिवसात मी ही बाब तपासून घेईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक विनंती करतो. जे पटलावर आहे तेच मी वाचलेले आहे. मी माझ्या मनातील काहीही वाचलेले नाही. माननीय उप मुख्यमंत्री त्यावेळी सभागृहात उपस्थित होते आणि त्यांनीही ते ऐकलेले आहे. आपण तपासून बघावे. ते पटलावरुन काढणे सोपे आहे या ठिकाणी जे वक्तव्य झाले ते दोन दिवस कामकाजामध्ये राहिले. तो सैनिकांच्या भावनाचा अवमान आहे, महाराष्ट्राच्या जनतेच्या भावनांचा अवमान आहे. माननीय मंत्री महोदयांनी निश्चितपणे माफी मागावी अशी आमची आग्रही भूमिका आहे. त्याचाही आपण विचार करावा.

**उप सभापती** : ठीक आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## डान्स बार बंदीच्या विरोधात सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी मी एका विषयाचा उल्लेख केला होता. सकाळी सुप्रीम कोर्टाचा निर्णय आलेला आहे आणि त्या निर्णयामुळे पुन्हा डान्स बार चालू होणार आहेत. शाहू, फुले, आंबेडकरांच्या या महाराष्ट्रामध्ये दोन्ही सभागृहाने एकमताने कायदा पारित केला. डान्स बारमध्ये काय चालते आणि काय नाही याची वर्णने आपण सर्वांनी वेगवेगळ्या वाहिन्यांवरुन आणि इतर माध्यमातून ऐकलेली आहेत, पाहिलेली आहेत. आपण न्यायालयांचा, सर्वोच्च न्यायालयाचा 100 टक्के सन्मान करतो यामध्ये कोणतीही शंका नाही. ज्या डान्स बारच्या संदर्भातील सत्यता आणि वास्तव आपणा सर्वांना माहीत आहे त्या बाबतीत कायदेमंडळाने हा कायदा केलेला आहे आणि तो कायदा जर कोर्ट स्ट्राईक डाऊन करणार असेल तर अशा वेळी कोठे तरी या सभागृहाचे पावित्र्य, या सभागृहाचे महत्व, सभागृहाने घेतलेल्या निर्णयांच्या संदर्भातील निर्देश पाहता सुप्रीम कोर्ट आपल्यापेक्षा वरचढ झाले आहे, की आपण जे कायदे करतो त्याचे इंटरप्रिटेशन कोर्टाने करावयाचे आहे, अशी स्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे सांस्कृतिक जीवन, समाजजीवन लक्षात घेऊन आपण कायदे केलेले आहेत आणि ते करीत असताना घटनेच्या मूलभूत अधिकारांचा सन्मान ठेऊन दोन्ही सभागृहाने एकमताने कायदे पारित केलेले आहेत. कारण या सर्व गोष्टींचा परिणाम महाराष्ट्राच्या सामान्य, सांस्कृतिक जनजीवनावर होत आहे, महिला ही उपभोग्य वस्तू आहे अशा पध्दतीने त्या ठिकाणी काम होत होते. विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. विवेक पाटील यांनी पनवेलमधील युवा पिढीविषयीचे चित्र रंगविले. ते सर्व लक्षात घेऊन आपण हा कायदा केला, निर्णय केला. तो निर्णय सुप्रीम कोर्टाने तांत्रिक आधारे स्ट्राईक डाऊन केला असेल तर मला असे वाटते की, आपण ही केस मजबुतीने लढविली पाहिजे आणि आपण पुन्हा सुप्रीम कोर्टाच्या फुल बेंचकडे गेले पाहिजे. आपण एकमताने पारित केलेला कायदा अशा पध्दतीने कोर्ट स्ट्राईक डाऊन करणार असतील ते योग्य नाही. त्यामध्ये काही चुका असतील तर ते आपण मान्य करु. परंतु कायदे मंडळाला कोर्टाने अशा पध्दतीने सुपरसीड करणे हे आपण कदापीही मान्य करता कामा नये. ज्यांनी आम्हाला

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D/

श्री. विनोद तावडे ....

निवडून पाठविले आहे त्या समाजजीवनावर काय परिणाम होतो याचा विचार करुनच तो निर्णय घेतलेला आहे. या बाबतीत अशा प्रकारचा कोणताही निर्णय होणार असेल तर तो आपण स्वीकारला पाहिजे असे मला वाटत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, डान्स बारच्या संदर्भात दोन्ही सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यामध्ये जशी गंभीर चर्चा झाली तसेच या विषयावर समाजमन कसे दुभंगलेले आहे याची जाणीव त्या चर्चेमध्ये आपल्याला वारंवार झाली होती. इतकेच नव्हे तर डान्स बारच्या बाजूने सुध्दा एका महिला मंचचे प्रतिनिधी या ठिकाणी सर्व आमदार, विरोधी पक्ष नेते आणि मंत्र्यांना सातत्याने भेटत होते. आज सर्वोच्च न्यायालयाचा नक्की काय निकाल आलेला आहे ? कामाची व्याख्या करीत असताना काम करणे हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे परंतु डान्स बारच्या संदर्भामध्ये झालेले गुन्हेगारीकरण, विशेषत: त्यामध्ये अल्पवयीन मुलींचा केला जाणारा व्यापार आणि त्यामधून निर्माण होणारी व्यसनाधीनता या पार्श्वभूमीवर काम परंतु वर्क विथ डिग्निटी, काम आणि महिलांची प्रतिष्ठा याचा विचार करुन आपण या सभागृहामध्ये निर्णय घेतला होता. त्यावेळेला संपूर्ण विरोधी वक्तव्ये आली होती. त्यामध्ये काही लोकांनी तर असेही म्हटले होते की, महाराष्ट्राच्या विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये हा कायदा केला जात आहे. त्यामध्ये त्यांनी नेहमीची काही मराठी आडनावे घेऊन या लोकांचा दृष्टीकोनच असा संकुचित असल्यामुळे महाराष्ट्रामध्ये असे कायदे केले जातात अशा पध्दतीने टाईम्स ऑफ इंडियामध्ये टीका झाली होती. दुर्दैवाने आपली बाजू मांडण्यामध्ये काही कारणांमुळे आपण कमी पडलो का,

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

त्याबद्दल शासन पुढे काय करणार आहे ?

काल पोलिसांसंबंधी सभागृहात चर्चा झाली होती. या राज्यात कायदा राबविण्यांवरच आघात होत असेल तर कशा प्रकारे आपण चांगले विषय पुढे नेणार आहोत, शासनाची कार्यपध्दती कोठे तरी चुकत आहे काय, याबाबत पुनर्विचार झाला पाहिजे. परंतु डान्स बारसंबंधी राज्य सरकारने निर्णय घेतला होता त्याबद्दलच आम्हाला रस आहे अशातील भाग नाही. परंतु सुप्रीम कोर्टाचा आज निर्णय आलेला असल्यामुळे व सभागृहाचे कामकाज चालू असल्यामुळे सरकारच्या सन्माननीय प्रतिनिधींनी यापुढे काय करावयाचे ठरविलेले आहे ते समजणे आवश्यक आहे. या सभागृहाच्या हक्कभंग समितीने डान्स बार असोसिएशनच्या अध्यक्षांना शिक्षाही केली होती. पुढील काळामध्ये शासन कोणती भूमिका घेणार आहे आणि ती कशा प्रकारे राबविली जाणार आहे, शासन कोठे कमी पडले आहे आणि कायद्यात कोणती दुरुस्ती केली पाहिजे याबद्दल सरकारकडून विश्लेषण व्हावे, सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, डान्स बार बंदी झाल्यानंतर या महाराष्ट्राच्या माननीय गृह मंत्र्यांचा व महाराष्ट्र शासनाचा गौरव झाल्याचे प्रत्येक वृत्तपत्रात छापून आले होते. किती तरी आया बहिणींनी अशा भावना व्यक्त केल्या होत्या की, या निर्णयामुळे आमची मुले, आमचा भाऊ, माझा नवरा वाचला आहे याचे श्रेय माननीय श्री.आर.आर.पाटील आणि या शासनाला आहे. डान्स बार बंद झाल्यानंतर दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली होती. त्याच्या प्रतीही माझ्याकडे आहेत. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी व जनतेने सरकारचे अभिनंदन केले होते. पनवेल भागाचा विचार केला तर पनवेल, खांदा कॉलनी, भिंगारी, खालापूर, पेण येथील डान्स बार बंद केल्यानंतर तेथील शेतकरी कामगार पक्षाच्या महिला संघटनांनी आनंद व्यक्त केला होता. त्यापूर्वी त्यांनी तीव्र आंदोलन केले होते.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाचा आज निकाल आलेला आहे. त्या निर्णयाबाबत मी बोलू इच्छित नाही. कायद्यांमध्ये दुरुस्त्या करणे, नवीन कायदे तयार करणे हे विधिमंडळाचे कार्य आहे. डान्स बार बंदीचा निर्णय ज्या मंत्र्यांनी घेतला आहे त्यांच्या कुटुंबीयांना आम्ही रस्त्यावर

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

येऊ देणार नाही, डान्स बारमधील महिला त्यांच्या घरापर्यंत पोहोचतील असे सांगून त्यांच्या संघटनांनी आवाज उठविला होता. काही वृत्त वाहिन्यांवर त्याच संघटनेच्या क्लिपिंग मी पाहिल्या आहेत. त्यावर विचार करुन शासन कायद्यामध्ये काही सुधारणा करणार आहे काय ? या देशातील देवी देवतांचा अवमान, अपमान झाला तर, एखाद्याने देवी देवतेची प्रतिमा छापलेले टी शर्ट घातले तर आणि पोलिसांनी त्याच्यावर कारवाई केल्यानंतर सभागृहात आक्रोश केला जातो. सभागृहात आवाज उठविला जातो. परंतु डान्स बारमध्ये तर गरीब मुली असहाय्यतेमुळे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे व धनिकांसमोर ठुमके लावून नाच करावयाच्या आणि त्यांची दुर्बलता बघून पैशांची उधळण करावयाची असा प्रकार सुरु होता.

डान्स बारसंबंधी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आला असला तरी त्या निकालाच्या विरोधात जाण्यासाठी कायद्यात सुधारणा केली जाणार आहे का आणि सुधारणा करुन कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात पुन्हा डान्स बार सुरु केले जाणार नाहीत अशी सरकार ग्वाही देणार आहे काय, डान्स बार संस्कृती समूळ नेस्तनाबूत करण्यासाठी सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य शासनाच्या निर्णयाला एकमताने पाठिंबा देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, जे राज्य सबंध देशामध्ये प्रगतीशील राज्य म्हणून ओळखले जाते. त्या महाराष्ट्र राज्याने डान्स बारबाबत प्रथम कायदा मंजूर केला. एक प्रकारे बिघडलेले सामाजिक संतुलन पुन्हा ठिकाणावर आणण्यासाठी या कायद्याचा चांगला उपयोग झाल्याचे आपण सर्वांनी बघितलेले आहे. केवळ डान्स बार बंदी या कायद्याबद्दल नाही तर सावकारी संबंधी कायदे असतील किंवा समाजावर दुष्परिणाम करणाऱ्या गोष्टी आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:40

श्री. हेमंत टकले....

त्या संदर्भातील जे कायदे आहेत ते अनेक वेळा सुप्रीम कोर्टामध्ये गेल्यानंतर मान्य होत नाहीत किंवा त्या कायद्यांना जे आव्हान देतात त्यांची भूमिका मान्य केली जाते आणि आपण सुरु केलेल्या परिवर्तनाच्या कामाला एक प्रकारे खीळ बसण्याची प्रक्रिया सुरु होते. मग प्रत्येक वेळा सन्माननीय सदस्य असे विचारतात की, महाराष्ट्र शासन आपली बाजू सुप्रीम कोर्टामध्ये मांडण्यात कमी पडले काय ? आपण त्यांच्या मागे पुरेशी बौध्दिक ताकद उभी करायला पाहिजे होती. सर्वोच्च न्यायालयामध्ये केस लढविणा-या वकिलांची फी, त्यांचे मानधन याबद्दल आपण काहीही बोलणे इष्ट नाही. मोठे वकील, त्यांची मोठी फी या सगळया बाबी बाजूला ठेवून सामाजिकदृष्ट्या, नैतिकदृष्टया आणि खरे म्हणजे या राज्यातील 50 टक्के स्त्री वर्गाला आपण लक्ष्य ठेवले असेल तर त्या दृष्टीने देखील तो एक महत्वाचा निर्णय होता आणि तो निर्णय सुप्रीम कोर्टाच्या आजच्या निकालामुळे स्थगित होणार असेल तर त्याबाबतीत राज्य शासनाने त्वरित पावले उचलली पाहिजेत. आपण अनेक बाबतीत कायद्यामध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरु करतो तशी ती केली पाहिजे. एक तर आपल्याला ऑर्डिनन्स काढावा लागेल किंवा दुस-या मार्गाचा अवलंब करुन ही बंदी पुढे तशीच चालू राहील अशी व्यवस्था करावी लागेल. कायदा सक्षम करावा लागेल आणि आपली बाजू सुप्रीम कोर्टामध्ये सक्षमपणे मांडण्यासाठी ज्या सक्षमतेची आवश्यकता आहे ती सक्षमता तयार करावी लागेल. या ऐतिहासिक निर्णयापासून एक पाऊल सुध्दा आपण मागे घेणार नाही अशा प्रकारचे आश्वासन महाराष्ट्र शासनाने सभागृहाला द्यावे आणि त्यासंदर्भातील कार्यवाही त्वरेने सुरु करावी अशी मी विनंती करतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या निर्णयावर आपण चर्चा करीत आहोत. मला आठवते की, आता मी जेथे बसलो आहे तेथे श्री. प्रमोद नवलकर बसत होते आणि बाजूला श्री. सुधीर जोशी बसत होते. या मुंबईतील प्रत्येक अड्डयाची, डान्सबारची, मटक्याची श्री. प्रमोद नवलकर यांना माहिती होती. तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए.आर.अंतुले यांनी त्यांना आव्हान दिले होते आणि सांगितले होते की, मुंबईमध्ये असे काही नाही. त्यांनी देखील सदनामध्ये आव्हान देऊन सांगितले की, "माझ्या बरोबर या, सर्व गोष्टी कशा चालतात हे मी दाखवितो." मग एका रात्री श्री. प्रमोद नवलकर आणि तत्कालीन मुख्यमंत्री दोघे फिरले आणि सर्व बेकायदेशीर गोष्टी पाहिल्या. या गोष्टींची माहिती असलेले नेते श्री. प्रमोद नवलकर हे त्यावेळी उभे राहिले आणि त्यांनी मंत्री महोदयांना स्पष्टपणे सांगितले होते की हा जो कायदा शासन आणत आहे या कायद्यामध्ये एवढया त्रुटी आहेत की हा कायदा न्यायालयामध्ये टिकणार नाही. आता अंधश्रध्देच्या विधेयकाच्या बाबतीत श्री.दाभोळकर हे सरकारच्या वतीने बोलतात. सरकार काहीच करीत नाही, जे काही करतो ते आम्हीच करतो असे ते सांगत असतात. कायदा करीत असताना ज्यांनी मुंबईतील नैतिकता चव्हाट्यावर आणली अशा नेत्यांचे मार्गदर्शन घेणे आवश्यक होते.

सभापती महोदय, हा प्रश्न विधी खात्याशी निगडित आहे. न्यायालयामध्ये कायदा टिकत नसेल तर तो बनविताना विधी खात्या मार्फत योग्य ती दक्षता घेतली जात नसावी असे माझे मत आहे. सावकारी प्रतिबंध कायदा 2005 साली दोन्ही सभागृहांनी संमत केला. तो कायदा राज्यकर्त्यांमुळे अडला की अधिका-यांमुळे अडला हा प्रश्न आहे. कायदा न्यायालयात टिकणार नसेल, त्यामध्ये त्रुटी असतील तर त्याबाबतीत आपण अधिका-यांना जाब विचारणार आहात की नाही.

...नंतर श्री. गिते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांची डान्सबार बंदी आणि संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान या दोन गोष्टीमुळे संपूर्ण् महाराष्टाला ओळख झालेली आहे. आता सावकारांना ढोपरापासून कोपरापर्यंत सोलले जात नाहीत आणि बारबाला डान्स करण्यापासून थांबत नाहीत. आम्ही या संदर्भात माननीय गृहमंत्री यांच्या बरोबर आहोत. तुम्हाला जे काही चांगले करावयाचे आहे त्यासाठी विरोधी पक्ष तुमच्या बरोबर राहील आणि तुम्ही भ्रष्टाचारापासून अनैतिक गोष्टीपर्यंत जे काही कराल त्यासाठी मात्र विरोधी पक्ष आपल्या समवेत नसेल अशी आमची भूमिका आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे बारबाला म्हणजे तरुणांच्या मनात सामाजिक विष निर्माण करणारे आहे. हे थांबले पाहिजे असे जर आपले मत असेल आणि सहकार कायद्यामध्ये गुजरातच्या सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा माननीय सहकार मंत्री ठामपणे सांगतात की, तो निर्णय गुजरात राज्यासाठी लागू आहे. आमच्या राज्यात आम्हाला कायदा करण्याचा अधिकार आहे. आम्ही जे केलेले आहे ते बरोबर आहे, असे ते ठामपणे सांगतात. सर्वोच्च न्यायालयाचा जो काही निकाल असेल तो संपूर्ण देशासाठी लागू होईल. परंतु आपल्याला खात्री असेल, आता सभागृहात जे मत मांडले गेले, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर असे म्हणाले की, हा कायदा पुन्हा अंमलात आणून आव्हानात्मक होत असेल तर त्यामध्ये दुरुस्ती करता येईल किंवा नाही हे बघावे. आपली हतबलता निर्माण होता कामा नये. आता न्यायालय विधिमंडळ चालवायला लागले आहे, याचा विचार आता आपणा सर्वांना करावा लागणार आहे. खास करुन शासनाला हा विचार करावाच लागेल की, शासन निर्णय घेण्यास कमकुवत ठरते म्हणून न्यायालय निर्णय घेते आणि शासन चालविते. म्हणून माझी विनंती आहे की, तुम्ही याबाबत विधि विभागाच्या संबंधित सचिवांना विचारणा केली पाहिजे. शासनाने केलेल्या प्रत्येक कायद्याला आव्हान दिले जात असेल, आपल्या कायद्यात त्रुटी राहत असतील आणि तो कायदा बाद होत असेल तर विधिमंडळाचे गांभीर्यच राहणार नाही. म्हणून आता तरी तो विषय गांभीर्याने घ्यावा आणि विधी विभागाला जाब विचारावा, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, परवा 21 पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. सरकारी वकील सांगतात की, त्यांना फाशी द्यावी. काही नीतीमत्ता आहे की नाही ?फाशी द्यावी, असा आग्रह सरकारी वकिलांनी का केला ? न्यायालयाला जो निर्णय द्यायचा होता तो निर्णय न्यायालयाने दिला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असता. सरकारी वकील उभा राहून आग्रह धरतो की, त्या सर्वांना फाशी द्यावी. लखनभैय्यासाठी ? या शासनाला काही आहे की नाही ? पोलिसांच्या बाजूने उभे राहून न्यायालयाचा जो काही निर्णय द्यायचा आहे तो देऊ द्यावा. परंतु किमान पोलिसांचे नितीधैर्य खचेल असे माननीय गृहमंत्र्यांनी आणि गृह विभागाने राहता कामा नये. तो कोणता वकील होता ? कर्तव्य पार पाडत असताना काही चुका झाल्या असतील तर ते न्यायालय बघून घेईल. परंतु सरकारी वकील त्यांना फाशी द्यावी, असा न्यायालयात आग्रह धरतो. प्रथम त्या वकिलाला तेथून निलंबित करावे. शासनाची ब्रअबू चव्हाट्यावर मांडणारी अशी विधी खात्यातील मंडळी असतील तरी, कोणतेही सरकार असले तरी तुम्ही त्यांची पर्वा करु नये, तरच तुमचे शासन व्यवस्थित चालेल. प्रत्येक गोष्टीमध्ये मनमानी सुरु आहे.

सभापती महोदय, बारबाला हा विषय अत्यंत गंभीर झालेला आहे. हा विषय आता सर्वोच्च न्यायालयात आहे. आपण काही गोष्टींवर बोलू शकत नाही. परंतु आपल्या राज्यात देशाकरिता जे पहिले पाऊल उचलले गेले ते बारबालांच्या संदर्भात उचलले गेले. तुम्ही डान्सबार बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे तुमची जनतेत चांगली प्रतिमा निर्माण झाली. तुम्हाला फसविण्यासाठी तुमच्याकडे सुद्धा बारबाला घुसल्या होत्या. या बाबतचे वृत्त छापून आले होते याची आपल्याला माहिती आहे. आपण या संदर्भात विधी विभागाला जाब विचारावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहात या विषयावर सर्व सन्माननीय सदस्यांनी विस्तृतपणे आपले मत मांडलेले आहे. सुप्रीम कोर्टाने नेमके काय म्हटलेले आहे याबद्दलची पूर्ण माहिती सभागृहाचे नेते म्हणून माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी मांडली असती तर बरे झाले असते, असे माझे मत आहे. कारण आपण सभागृहात या विषयावर जी चर्चा करीत आहोत, त्या चर्चेला एका अर्थाने दिशा मिळाली असती. त्यामुळे शासनाकडूनच एका अर्थाने सुप्रीम कोर्टाने नेमके काय म्हटले आणि त्यामुळे नेमके काय घडणार आहे याबद्दलचे निवेदन शासनाने केले असते तर बरे झाले असते, असे मला वाटते.

सभापती महोदय, भावना, संस्कृती का कायदा. दुर्दैवाने श्री.पाटील साहेब भावना आणि कायदा यामध्ये कायद्याला महत्व आजच्या लॉ ऑफ लँडमध्ये तरी आहे. त्यामुळे आज तरी भावना आणि संस्कृतीपेक्षा सुप्रीम कोर्टाने जे सांगितले त्याचेच महत्व जास्त आहे.

यानंतर श्री.भोगले......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

त्यामुळे भावना आणि संस्कृती याच्या मागे दोन्ही सभागृहे उभी आहेत, उद्याही उभी राहतील. आज Law of land वर सुप्रीम कोर्टाचे जज्जमेंट आलेले आहे. Judiciary should not encroach into legislation हे जरी खरे असले, कायदे मंडळाचे महत्व राखले गेले पाहिजे हे जरी खरे असले तरी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर आम्ही कोणी टिप्पणी करीत नाही, त्याबद्दलचे रिफ्लेक्शन सदनामध्ये होणे आवश्यक आहे असेही नाही, तेही आपण करीत नाही.

सभापती महोदय, कोणताही कायदा बनविण्यापूर्वी सभागृहात विचार करताना स्वाभाविकत: समाज, माणसे, संस्कृती रक्षण, महिला रक्षण, चाईल्ड प्रोटेक्शन या सगळ्यांचा विचार नक्की केला गेला असावा. आपल्या भावना समजून घेऊन त्या कायद्यात उतरविताना मात्र basic principle of constitution, equal opportunity, equal protection या सगळ्यांचा विचार करुन कायदा बनविला होता का? हा प्रश्न सुप्रीम कोर्टाच्या जज्जमेंटमुळे अनुत्तरित आहे किंवा त्यावर चर्चा करता येईल अशा प्रकारचा आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे त्यावर जास्त टिप्पणी करण्यापेक्षा सुप्रीम कोर्टाने नेमकी काय टिप्पणी केली आहे, त्या आदेशानंतर सरकार review, appeal or full bench कडे जाणार का? या निर्णयानंतर सरकारचा रोड मॅप काय आहे या गोष्टीचे स्पष्टीकरण व्हावे. मी सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्र आणि दोन्ही सभागृहे सरकारसोबत उभी होती आणि उभी राहणार आहेत. त्यामुळे माझी विनंती आहे की या संदर्भात स्पष्टता येण्यासाठी, कायद्यांतर्गत करता येत असेल तर दोन्ही सभागृहाची विशेष समिती स्थापन करावी. पुढे या निर्णयाविरुध्द सरकार अपिल किंवा रिव्ह्यूमध्ये जाणार असले तरी दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करावी आणि या विषयाबाबत आपण गंभीर आहोत, united आहोत, consultative आहोत हे दिसू द्या. याबाबत शासनाने आपला रोड मॅप स्पष्ट करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, डान्सबारचा विषय पनवेल येथून सुरु झाला होता. पनवेल मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी विधानसभा सदस्यांच्या गॅलरीमध्ये उपस्थित आहेत. पनवेल आणि तो परिसर तसेच रायगड जिल्हयामधील शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात पैसा आला आहे. मी काल स्व.दि.बा.पाटील यांच्या शोकप्रस्तावावर बोलत असताना हेच सांगितले होते की, रायगड

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

जिल्हयातील शेतकऱ्यांना 12.5 टक्के भूखंड मिळवून देण्याच्या निर्णयाचे सर्व श्रेय स्व.दि.बा.पाटील यांनाच जाते. या निर्णयामुळे रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांनी कधी पैसे पाहिले नव्हते त्यांच्याकडे जमीन विक्रीच्या माध्यमातून मोठया प्रमाणात पैसा आला. आज त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील तरुण मुले डान्सबारमध्ये जाऊन बारबालांवर पैसे उधळण्याचे पातक करीत आहेत. मोठ्या संख्येने डान्सबार सुरु असल्यामुळे रायगड जिल्ह्यातूनच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातून रात्रीच्या वेळी शेकडो वाहने पनवेलमध्ये येतात. या विरोधात आमच्या पक्षाच्या आमदारांच्या आणि महिला आघाडीच्या वतीने आंदोलने केली गेली.

दोन्ही सभागृहामध्ये या विषयाबाबत चर्चा होऊन एक सर्वंकष कायदा केला गेला. कायदे बनविण्याचा अधिकार विधिमंडळाला असला आणि त्या कायद्याप्रमाणे निर्णय देण्याचा अधिकार न्यायालयाला असला तरी आज न्यायालयाकडून कायदे कसे बनवावेत याबाबत निदेश दिले जात असतील तर ती चिंतेची बाब आहे. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले होते की, विधिमंडळ आणि न्यायालय या स्वतंत्र संस्था राहतील. दोघांनीही एकमेकाच्या कारभारात हस्तक्षेप करायचा नाही. संकेताचे पालन करावे. हे घटनाकारांना अभिप्रेत होते. आज संपूर्ण राज्य सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे चिंताग्रस्त बनलेले आहे. या विषयाला गांभीर्य प्राप्त व्हावे म्हणून आजचे सभागृहाचे कामकाज तहकूब करावे. निर्णय देण्याबाबत सुप्रीम कोर्ट अंतिम आहे.

नंतर डब्ल्यू..1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

सभापती महोदय, उद्या डान्स बार सुरु झाले तर लोक प्रतिनिधी म्हणून आम्हाला शरमेने मान खाली घालावी लागेल. त्यामुळे डान्सबारच्या संदर्भात या सभागृहात गांभीर्याने चर्चा होण्याची आवश्यकता आहे. मला माननीय गृहमंत्र्यांना सांगावेसे वाटते की, डान्सबारच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय आलेला आहे याचीही संपूर्ण माहिती सभागृहाला दिली जावी व त्यानुसार डान्सबारच्या संदर्भात पुढील धोरण ठरविले जावे. डान्स बार बंदीच्या बाजूने संपूर्ण सभागृह आहे हे पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाला व महाराष्ट्रातील जनतेला कळले पाहिजे. हे सभागृह बारओनर्सच्या विरोधात आहे हे सर्वांना समजले पाहिजे. डान्सबारच्या संदर्भात आपण जे कायदे केलेले आहेत ते अपुरे असले तरी आपल्याला हायकोर्टात आणि सुप्रीम कोर्टात जे काही अपयश येते त्यासंदर्भात कोणत्या वकिलाला नेमायचे हे बघण्याची वेळ आता सरकारवर आलेली आहे असे मला वाटते. आपले वकील मॅनेज होतात अशी चर्चा बाहेर होत असते. "आम्ही आपल्या वकिलांचा बंदोबस्त करु, तुम्ही काळजी करु नका, तुम्ही फक्त सभागृहात गप्प बसा" असे आम्हाला बार ओनर्स सांगतात. बार ओनर्स मला प्रत्यक्ष येऊन भेटलेले आहेत. कायदे तयार करतांना आपल्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून मुद्दाम अपुरेपणा ठेवला जातो काय, जाणून बुजून चुका ठेवल्या जातात काय याचाही विचार करण्याची आता वेळ आलेली आहे त्यामुळे डान्स बारचे गांभीर्य लक्षात घेऊन डान्स बार बंदीच्या संदर्भात एक मुखाने ठराव करुन संपूर्ण सभागृह बारडान्सच्या तसेच बार ओनर्सच्या विरोधात आहे हे दाखवून देण्याची हीच वेळ आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डान्स बारच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय येण्यापूर्वी आज सकाळच्या 9 च्या बातम्यांमध्ये प्रत्येक चॅनलवर "आज डान्सबारच्या संदर्भात सुप्रीम कोर्टाचा निर्णय येणार आहे" अशी माहिती दिली जात होती. सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय येणार आहे हे चॅनलवाल्यांना बहुदा समजले होते अशा प्रकारचे वृत्त चॅनलवाले देत होते व त्याबरोबर डान्सबारच्या क्लिपींग दाखवत होते. आज सकाळी 10.30 वाजता सुप्रीम कोर्टाने डान्सबारची बंदी उठवल्यामुळे महाराष्ट्रातील समाजमनाला एक जबरदस्त झटका बसला आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. राज्य सरकारने महाराष्ट्राचे समाजमन ओळखून कायदा केला होता परंतु दुर्दैवाने हा कायदा सुप्रीम कोर्टात टिकला नाही. बारबालांसाठी आई पैसे देत नाही म्हणून आईचा खून करण्यात आला अशा प्रकारच्या घटना त्या काळात घडलेल्या आहेत. सुप्रीम कोर्टात कोण हरले आणि कोण जिंकले यापेक्षा डान्सबारचा कायदा कडक करुन कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात डान्सबार पुन्हा सुरु होणार नाहीत यासाठी आपल्या सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे. डान्सबार बंद करण्यासाठी विरोधी पक्ष सुध्दा एकमताने आपल्या पाठीशी असल्याबद्दल विरोधी पक्षाला धन्यवाद दिले पाहिजे. मी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना विनंती करतो की, जर आपल्या कायद्यात त्रुटी असतील आणि त्या त्रुटी सुप्रीम कोर्टाने दाखविल्या असतील तर त्या त्रुटी दुरुस्त करुन पुन्हा कायदा पारीत केला तरी काही हरकत नाही. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन महाराष्ट्रातील संस्कृतीला जपण्याचा प्रयत्न करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, डान्स बारवर बंदी घालण्यासाठी या सभागृहामध्ये चर्चा झाली होती. त्यावेळी कायद्याचा जो ड्राफ्ट बनविला होता त्यामध्ये चुका आहेत, त्रुटी आहेत, डिस्क्रीमिनेशन आहे असे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी विशेष करून विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी नमूद केले होते. त्यावेळी सन्माननीय विरोधी पक्ष नेते पदी श्री.नितीन गडकरी होते. असे असताना त्यावेळी आपण तो ड्राफ्ट बंदी आणण्यासाठी दामटवून नेला. या मुद्यासंबंधी आपण हायकोर्टामध्ये हरलो त्यावेळी देखील यासंबंधी चर्चा झाली होती. तेव्हा देखील याच गोष्टीवर बोट दाखविले होते. आपण जो मसुदा तयार केला होता तो चुकीचा होता. त्यामुळे आपण वारंवार तोंडावर आपटत होतो. त्या मसुद्यात सुधारणा करणे फार गरजेचे आहे. सुप्रीम कोर्टात ज्यावेळी ऑर्ग्युमेंट सुरू होते त्यावेळी सुदैवाने मी सुप्रीम कोर्टामध्ये हजर होतो. तेव्हा डान्स बार ओनर्स असोसिएशनचे बार मालक मला सांगत होते की, आम्ही जिंकणार. आताच सन्माननीय सदस्य श्री.जयंतभाई पाटील यांनी सांगितले की, आम्ही सर्व व्यवस्था करून ठेवली आहे. ड्राफ्टमध्ये कशा चुका असतील याची आम्ही व्यवस्था करून ठेवली आहे असे बार मालक सांगत होते. हे मी त्यावेळी देखील सांगितले होते आणि आज पुन्हा सांगतो की, गुटखा बंदीच्या बाबतीत देखील हेच होणार आहे. कारण परवाच मी गुटखा बंदीच्या संदर्भातील कोर्टातील ऑर्ग्युमेंट ऐकून आलो आहे. म्हणजे चुका ह्या जाणूनबुजून ठेवल्या जातात. त्या चुकांच्या आधारावर कोर्ट त्यांच्या बाजूने निर्णय देते.

आताच सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले की, पूर्ण जजमेंट हातात आल्यानंतर सुप्रीम कोर्टाने काय निर्णय दिला ते कळेल. यासंबंधी सुप्रीम कोर्टाने कुठल्याही प्रकारच्या उपाययोजनांची वाच्यता केल्याचे मी सुप्रीम कोर्टात ऐकले नाही. त्यामुळे माझी मागणी आहे की, उद्या डान्स बार सुरू झाले तरी बाकीचे निर्णय घेणे आपल्या हातामध्ये आहेत. तेव्हा डान्स बारमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावून तेथे येणारा प्रत्येक माणूस टिपला गेला पाहिजे. तेथे ॲन्टी सोशालिस्ट कशाला येतात या सर्व गोष्टींची नोंद झाली तर त्याचा निश्चितच फायदा होईल. हे सर्व काम वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने केले तर दुकान चालू असताना त्यात जाणारा ग्राहक बंद झाला तर आपोआपच डान्स बार बंद होतील. पण त्यासाठी राजकीय शक्ती, ताकद आपण दाखविणार आहात काय, हा खरा प्रश्न आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

सुप्रीम कोर्टामध्ये आपली बाजू मांडण्यामध्ये आपण चुका केल्या आहेत. आम्ही वारंवार सांगत होतो, कायद्यातील डिस्क्रीमिनेशन आम्ही प्रत्येक वेळी नजरेत आणून देत होतो, तरी देखील त्यावर कुठल्याही प्रकारचे लक्ष आपल्याकडून दिले गेले नाही. विधी खात्याने यामध्ये चुका केल्या व त्याचा फटका पुन्हा आपल्याला बसला आहे. मला एका डान्स बार मालकाने सांगितले होते की, आम्ही ड्राफ्ट लिहून दिला आहे, तुम्ही आम्हाला काय सांगता. त्या माणसाचे नाव देखील सांगायला मी तयार आहे. मी नाव सांगू का ? तो आपल्याच ओळखीचा आहे. त्या दिवशी जे ऑर्ग्युमेंट झाले ते मी ऐकले आहे. त्यामुळे न टिकणारे ड्राफ्टस तयार करण्यात येणार नाहीत, न टिकणाऱ्या गोष्टी पुन्हा करण्यात येणार नाहीत याची काळजी घ्यावी. डान्स बार सुरू झाले तरी पोलीस खात्याचा वचक राहिला पाहिजे. पोलीस मजबूत राहिले तर ते दुकान आपोआप बंद होईल. यासाठी राजकीय इच्छा शक्तींची गरज आहे. याबाबत एक पॅनल तयार करावे अशी सूचना सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी केली आहे. त्यांनी केलेली सूचना पुढे घेऊन आपण जावे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांना बोलावयाचे आहे. मला एक प्रश्न पडला आहे की, या मुद्यावर आपण काय बोलणार आहात ? आता सन्माननीय सदस्यांनी आपले अनुभवाचे बोल बोलावे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या विषयावर मी बोलण्यासाठी उभा राहिल्यामुळे सर्वांच्या भुवया उंचावणे स्वाभाविकच आहे.

**उप सभापती** : आताच सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी डान्स बारमध्ये सीसीटीव्हीची सोय करावी अशी सूचना केली आहे. त्यामुळे या पुढे डान्स बार मध्ये जाणारा प्रत्येक माणूस हा कॅमेऱ्यामध्ये येणार आहे, हा मुद्दा आपण लक्षात ठेवावा.

श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोदजी तावडे यांनी औचित्याच्या मुद्याच्या रूपाने एका महत्वाच्या विषयाकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे. त्यासंबंधी चांगली चर्चा सभागृहात सुरू आहे. या चर्चेच्या अनुषंगाने मी दोन मुद्दे शासनाच्या निदर्शनास आणून देणार आहे. आपण कायदे करतो. त्यात सुधारणा करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे..

मात्र मसुद्यामध्ये उणिवा राहिल्यामुळे आपण न्यायालयात लढाई हरतो. आपण एकमताने डान्स बार बंदी कायद्यात असलेल्या त्रुटी काढून पुन्हा तो कायदा प्रस्तावित करण्याचा निर्णय करीत आहोत.

सभापती महोदय, मी या निमित्ताने एक मुद्दा लक्षात आणून देऊ इच्छितो की, शासन आणि प्रशासनाच्या विरोधात माननीय उच्च न्यायालयात आणि माननीय सर्वोच्च न्यायालयात जे जे खटले दाखल होतात त्यामध्ये शासन आरोपीच्या पिंजऱ्यात जात आहे. शासन जे निर्णय घेते ते सर्व चुकीचे असतात अशा तऱ्हेचा संदेश सर्वत्र जात आहे. हा संदेश दुरूस्त करण्यासाठी एक चांगली भरभक्कम यंत्रणा राबविण्याची आवश्यकता आहे. तसेच कायद्याच्या अधीन राहून योग्य तऱ्हेने कायदा तयार करण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांना साक्षर करण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे अधिक्ऱ्यांनी सादर केलेले मसुदे योग्य आहेत किंवा कसे हे मंत्री महोदयांनी पाहिले पाहिजे. अधिकारी मॅनेज तर झाले नाहीत ना हे देखील तपासण्याची नितांत गरज आहे. अधिकाऱ्यांनी त्रुटी असलेला मुसदा सादर केल्यास न्यायालयात शासनाची नाचक्की होते. यापुढे अशी नाचक्की होणार नाही याची दखल घेण्याची गरज आहे एवढेच मी सांगून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाने डान्स बार बंदीच्या संदर्भात नुकताच जो अंतिम निर्णय दिला त्या संदर्भात या सदनामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटल्याचे दिसत आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी हा मुद्दा कोणत्या नियमाखाली उपस्थित केला ते मला माहीत नाही. डान्स बारच्या संदर्भात जी चर्चा होत आहे त्यावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागील विधानसभेमध्ये माननीय गृह मंत्री महोदयानी डान्स बार बंदीचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. त्या निर्णयाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी समर्थन केले. डान्स बार बंदीचे सर्वसामान्य जनतेकडून देखील स्वागत झाले. राज्य शासनाने हा निर्णय अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारे घे्तला होता. आपण केलेला कायदा उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात टिकावा या दृष्टीने कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने राज्य सरकारने पाऊल उचलावे. डान्स बारला बंदी असावी असे सर्वच पक्षातील सदस्यांचे मत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे.....

महाराष्ट्रातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने हा निर्णय घेतला पाहिजे. तेव्हा शासनाने या कायद्यामध्ये दुरुस्ती करावी अशी सूचना करतो. डान्स बार बंदीच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना विचारात घ्याव्यात आणि त्या दृष्टीने गृह विभागाने तसा कायदा आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी सूचना आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, मी या संदर्भात एवढेच सांगू इच्छितो की, कोणताही कायदा ज्या विशिष्ट काळात केला जातो त्यावेळी तो परिपूर्ण असतोच असे नाही. काळाबरोबर कायद्यातील त्रुटींची जाणीव होते. सर्वोच्च न्यायालयात कायद्याची फार मोठ्या प्रमाणावर चिकित्सा केली जाते. डान्स बार बंदी कायद्यामध्ये काही उणिवा राहिल्या आहेत म्हणून शासनाने निराश होण्याचे काही कारण नाही. काळाबरोबर कायद्यामध्ये बदल होत असतात. आपणास माहीत आहे की, राज्य घटनेमध्ये देखील दुरुस्त्या होत आहेत.

सभापती महोदय, राज्य शासनाने डान्स बार बंदीचा कायदा केल्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला एक दिलासा मिळाला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

चुकीच्या मार्गाने निघालेल्या तरुणाईला या कायद्याने रोखले. त्याचे श्रेय माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना द्यावे लागेल. डान्सबार बंदीच्या कायद्यामुळे आपल्या सर्वांना दिलासा मिळाला. सुप्रीम कोर्टाने जे इंटरप्रिटेशन केले आहे त्याचे वर्णन "वरुन दिसते तसे नसते" एवढेच करावे लागेल. सुप्रीम कोर्ट बारबालांना कामगारांचा दर्जा देत आहे. परंतु अशा प्रकारचा दर्जा दिल्यानंतर त्याचे दुष्परिणाम काय होतील याचा देखील विचार केला पाहिजे. परंतु तशा प्रकारचा विचार झाल्याचे दिसत नाही. त्यांनी रात्रीच्या जगाचा विचार केलेला दिसत नाही. मी आक्षेप घेत नाही. बारबाला कला, कौशल्य दाखवितात म्हणून त्यांना कामगाराचा दर्जा दिल्यानंतर त्याचे दुष्परिणाम काय होतील याचा विचार सुप्रीम कोर्टाने केला पाहिजे. विचार न करणाऱ्या बेधुंद तरुणाईचे जे एक्स्प्लॉयटेशन होत आहे त्याचा विचार सुप्रीम कोर्टाने केला पाहिजे. या निमित्ताने शेवटी एवढीच मागणी करतो की, डान्सबार बंदी कायद्याची आवश्यकता असल्यामुळे या कायद्याचा पुनर्विचार करुन तो दुरुस्त केला पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यमातून सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी डान्सबार बंदीबाबत सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाबाबतचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांच्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी विधानसभा सदस्य असताना पेण मतदारसंघाचे सन्माननीय सदस्य श्री.विवेक पाटील यांनी विधानसभा सभागृहात डान्सबार बंदीचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. त्यांच्या मागणीला सर्वांनीच एकमताने पाठिंबा दिला होता. डान्सबार बंदीचा निर्णय केवळ माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी घेतला असे नाही. डान्सबारमुळे लाखो बेरोजगार तरुण उध्वस्त होतात, लाखो संसार उध्वस्त होतात म्हणून त्याला पायबंद घातला पाहिजे असा मुद्दा त्या वेळी आमच्या समोर आला होता. डान्सबार बंदीचा निर्णय घेण्यास भाग पाडून आम्ही चूक केली असे मला वाटत नाही. परंतु एक गोष्ट मला आपल्या माध्यमातून शासनाला आणि माननीय श्री.आर.आर.पाटील यांना सांगितली पाहिजे की, शासनाच्या निर्णयाविरोधात न्यायालयाने निर्णय दिल्याचे हे पहिलेच उदाहरण आहे असे नाही. यापूर्वी सुध्दा न्यायालयाने असे अनेक निर्णय दिलेले आहेत. आपण दररोज वर्तमानपत्र वाचतो. आजच्या वर्तमानपत्रात न्यायालयाने शासनावर कठोर टीका केली आहे. न्यायालयाने नमूद केले की, हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

शासन ऐकत नसेल तर जनतेने या शासनाचा निवडणुकीत विचार करावा. महोदय, ही आजच्या वर्तमानपत्रातील बातमी आहे. या बातमीचे कात्रण देण्यास मी तयार आहे. इतक्या टोकाच्या भूमिकेला जाऊन न्यायालय सरकारच्या बाबतीत बोलत आहे. औषध खरेदी, आदिवासी विभागातील खरेदी, सिंचन घोटाळा, बांधकाम घोटाळा इ. सर्व घोटाळे आणि त्याबाबत न्यायालयाने दिलेले निर्णय पाहिले तर कधी कधी असे वाटते की, हे विधिमंडळ न्यायालय चालविते की सरकार चालविते, असा विचार सर्वसामान्य माणसांच्या मनात का येऊ नये ?

सभापती महोदय, विधिमंडळाला कायदेमंडळ म्हटले जाते. कायदेमंडळ म्हणून आम्हा सदस्यांना काही अधिकार आहेत की नाहीत, या बाबत देखील विचार करण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. न्यायालयाने एकदा निर्णय दिल्यानंतर त्यावर बोलता येत नाही. काल एक विषय उपस्थित झाला होता. त्यावेळी आमच्या पक्षाचे गटनेते उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, न्यायालयाने या विषयी स्थगिती दिली आहे. त्यानंतर आपण तो विषय तेथेच थांबविला.

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

आपल्याला न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द सभागृहात बोलता येत नाही व आपण बोलत नाही. ते पथ्य आपण पाळतो. मग या सार्वभौम सभागृहाने एखादा निर्णय घेतल्यानंतर त्यावर देखील निर्णय द्यावा की नाही आणि जर तसे होत असेल तर त्या बाबतीत नेमकी काय भूमिका घ्यावी या बाबतीत देखील आपण सर्वांनी अतिशय गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो विषय उपस्थित केला ती सुध्दा साधी बाब नाही. एकाच वेळेला 13 पोलिसांना जन्मठेप होणे ही बाब या महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा घडलेली आहे. यापुढे पोलीस एन्काऊंटर करणार नाहीत. पोलीस गोळ्या खातील. जी बाब आझाद मैदानावर घडली त्यामध्ये 50 हजार देशद्रोही मुसलमान एका ठिकाणी आले, पोलिसांना लाथाबुक्क्यांनी झोडले, आमच्या महिला भगिनींच्या अब्रूचे धिंडवडे काढले. तशीच बाब भविष्यामध्ये आम्हाला बघावयाची आहे का ? यापुढे पोलिसांनी फक्त बघ्याची भूमिका घ्यावयाची, गोळ्या खायच्या, लाथाबुक्क्याचे फटके खायचे, देशद्रोह्यांनी त्यांना हाणायचे पण पोलिसांनी काही करावयाचे नाही. एकाच वेळी 13 पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा होणे ही साधी बाब नाही. दुर्दैवाने आमचा सरकारी वकील सांगतो की, यांना जन्मठेपेची शिक्षा द्यावी, यांना फाशी द्यावी. ही साधी बाब नाही. म्हणून आपण विधी व न्याय खाते अधिक समृध्द करण्यासाठी नेमके काय करणार आहात ?

सभापती महोदय, यामध्ये खरा दोष आपल्या विधी व न्याय खात्याचा आहे. त्यामध्ये आपण लक्ष घातले पाहिजे. आपण मुळावरच घाव घातला पाहिजे. आपण मुळापर्यंत पोहोचले पाहिजे. हे कोठे घडते, का घडते, याला कोण जबाबदार आहे हे पाहिले पाहिजे. विधी व न्याय खात्याचे जे सचिव असतील त्यांची पहिल्यांदा हकालपट्टी करा. फांद्या आणि पाने बघण्यापेक्षा मुळावरच घाव घालावा. आमचे एक मित्र विधी व न्याय खात्याचे राज्यमंत्री होते ते गेले. अगोदरच त्यांचा राजीनामा घेऊन टाकला. त्या खात्याचे जे कोणी सचिव असतील त्यांच्या मुळावर घाव घालून पहिल्यांदा त्यांची हकालपट्टी करावी. प्रतिदिन जर या विधिमंडळाचे अधिकार कमी करण्याचे काम जर होत असेल तर त्या बाबतीत देखील आपण सर्वांनी एकत्र येऊन भूमिका घेतली पाहिजे. हा

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. रामदास कदम .....

निर्णय तुमचा नाही, आमचा नाही. आपण सांगितल्याप्रमाणे ही विधिमंडळाची शान आहे. त्या अनुषंगाने देखील कारवाई होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, मधल्या काळामध्ये आपले ढोबळे नावाचे अधिकारी ज्या पध्दतीने वागले ती पध्दत बरोबर नव्हती. त्यावेळचे पोलीस आयुक्त श्री. पटनाईक यांचा त्यांना पाठिंबा होता. त्यांचा काहीही संबंध नसताना प्रत्येक ठिकाणी ते जायचे तेव्हा त्यांच्या सोबत दहा लोक असायचे. त्या ठिकाणी गेल्यानंतर गल्ला फोडायचा, कपाटे फोडायची, त्यातील पैसे काढायचे आणि या ठिकाणी वेश्या व्यवसाय चालायचा असे असत्य लिहून देत होते. मी आपल्याकडे प्रकरणे दिलेली आहेत त्याची चौकशी करावी. मी सभागृहामध्ये जबाबदारीने बोलतो. अशा अधिकाऱ्यांना कोण लगाम घालणार ? त्यांच्या पाठीमागे जर पोलीस आयुक्त असतील तर कायदा व सुव्यवस्था कोण सांभाळणार ?

सभापती महोदय, माझी आपणामार्फत शासनाला विनंती आहे की, आपल्या विधी व न्याय खात्याच्या बाबतीत आपल्याला मोठ्या प्रमाणावर बदल करावे लागतील. या ठिकाण्ी अनेक सन्माननीय सदस्यांनी काही उपाययोजना सांगितल्या. काही सदस्यांनी सांगितले की, याबाबत एक समिती नेमावी. आपल्याला वाटत असेल तर समिती नेमावी पण समिती नेमण्यापेक्षा ॲड. आशिष शेलार, ॲड. जयप्रकाश छाजेड यांच्यासारखे सदस्य असतील त्यांना घ्यावे तसेच त्यांच्यासोबत ज्यांना कायद्याची चांगली माहिती आहे अशी माणसे घ्यावीत आणि कायद्याचा कीस काढून जर आपण एखादा ड्राफ्ट न्यायालयामध्ये पाठविला तर वाटेल ते झाले तरी न्यायालय सरकारला यत्किंचितही मान खाली घालावयास लावणार नाही व तशा पध्दतीची संधी न्यायालयाला मिळणार नाही. असे काम आपल्या शासनाकडून, विधी व न्याय खात्याकडून व्हावे अशी अपेक्षा बाळगतो. सर्वात शेवटी का होईना आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले अंत:करणापासून, मनापासून आभार मानतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, आज या ठिकाणी अतिशय गंभीर विषयावर चर्चा होत आहे. सुप्रीम कोर्टाकडून जो निर्णय आलेला आहे त्या विरोधात सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केलेले आहे. खरे तर एक महिला म्हणून बोलत असताना मी सांगू इच्छिते की, डान्स बारमुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

त्याच्या विरोधामध्ये अनेक महिलांनी किंवा वेगवेगळ्या संघटनांनी निदर्शने केलेली आहेत. डान्स बार बंदी करण्यासाठी अनेकांनी मोर्चे काढल्याचे सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. हे सर्व झाल्यानंतर माननीय गृहमंत्री यांनी आणि आपण सर्वांनी मते मांडल्यानंतर विधी खात्याकडून कायदा तयार करण्यात आला. तो या सभागृहात मंजूर करण्यात आला, त्यानंतर डान्स बारवर बंदी घातली गेली होती. एक अतिशय महत्वाचे पाऊल राज्य शासनाने उचलले होते. परंतु त्या कायद्यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या असतील तर त्या शासनाने निश्चितपणे दुरुस्त कराव्या आणि डान्स बार बंदी कायम ठेवण्यात यावी अशी मी विनंती करते. यासाठी दोन्ही बाजूचे सर्व सन्माननीय सदस्य एकत्र होते आणि आहेत हे आजच्या सर्वांच्या भाषणातून दिसून आलेले आहे. मी पुन्हा एकदा शासनाला विनंती करीन की, डान्स बारवरील बंदी कायम ठेवण्यात यावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे डान्स बारबंदी संबंधी मुद्दा उपस्थित केला आहे आणि त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनीही आपली मते व्यक्त केलेली आहेत. त्यासंबंधी शासनाची भूमिका व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

विधानसभेमध्ये आणि या सभागृहामध्ये एकमताने आपण डान्स बार संबंधी जो कायदा पारित केला होता तो कायदा आज रद्दबातल झालेला आहे. याबाबत मी फार पार्श्वभूमी सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु त्यावेळी राज्य सरकारने राजकीय अभिनिवेशाने हा निर्णय घेतला नव्हता. एका विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी पनवेलमधील डान्स बार बंदीचा विषय लक्षवेधीच्या अनुषंगाने सभागृहामध्ये चर्चेसाठी आणला होता. त्याचे एकंदरीत परिणाम लक्षात घेऊन, सदनाच्या भावना लक्षात घेऊन त्यावेळी डान्स बारबंदीचा निर्णय या सदनामध्ये घोषित केला होता. गृह मंत्री म्हणून काम करीत असताना मला त्यापूर्वीची थोडीशी माहिती होती. ज्या भागामध्ये डान्स बार आहेत त्या भागामध्ये पोलीस अधिकारी आग्रहाने पोस्टिंग मागत होते. त्याच्याही पाठीमागची कारणे शोधली तर काहींचे लागेबांधे निर्माण झाले होते. ज्या बिल्डिंगमध्ये डान्स बार आहेत तेथील नागरिकांना राहणे मुश्कील झाले होते. एकंदरितच आज देशात व राज्यात महिलांच्या प्रतिष्ठेसाठी त्यांच्या मान सन्मानासाठी अनेक कायदे मंजूर होत असताना दोन्ही सदनांनी त्यावेळी पुरोगामी

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील........

भूमिका घेतली होती. त्यामध्ये महिलांना खऱ्या अर्थाने अवमानित केले जात होते. त्यांचे शोषण केले जात होते. डान्स बार मालकांची संघटनाच त्याची मोठी लाभार्थी होती. सर्व व्यवस्था त्यांनी हातामध्ये घेतल्यासारखी स्थिती होती. राज्यातील डान्स बारची संख्या 1200 पेक्षा अधिक झाली होती. सरकारकडे आलेल्या मागण्यांची संख्या त्यापेक्षा अधिक होती. दोन्ही सदनांच्या भावना लक्षात घेऊन, अनेक महिला संघटनांनी सरकारला दिलेली निवेदने लक्षात घेऊन डान्स बार बंदीचा निर्णय सदनामध्येच घोषित केला होता. शासनाची व दोन्ही सदनांची इच्छा लक्षात घेऊन त्या काळातील गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, ॲडव्होकेट जनरल, तज्ज्ञ वकिलांची एक टीम बसवून त्या कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले होते. केवळ प्रारुप तयार झाल्यावर त्यांनीच कायदा पास केला अशातील नाही तर दोन्ही सदनांमध्ये त्या विधेयकावर 3-3 दिवस सविस्तरपणे चर्चा झाली होती. अलीकडच्या काळामध्ये दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एकमताने जे निर्णय घेतलेले आहेत त्यातील एक महत्वपूर्ण तो निर्णय होता. सभागृहाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी एकत्रितपणे मुंबईत व महाराष्ट्रात डान्स बार संस्कृती तयार होऊ लागली आहे ती बंद करावी अशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने तो निर्णय घेतला होता. त्यानंतर दोन्ही सदनांमध्ये तो कायदा पारित केला होता.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

आजच जजमेण्ट आले. व्हर्डिक्ट काय आहे याचे डिटेल्स ना मला कळलेले आहेत ना आमच्या वकिलांना कळलेले आहेत. कोर्टाने जो काही निर्णय दिलेला आहे त्याच्या खोलात जाऊन वकील अभ्यास करतील. सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना मला मान्य आहे. प्रथम व्हर्डिक्टचा अभ्यास केला पाहिजे. अधिवेशन 3 आठवडे चालणार आहे. दोन्ही सदनातील प्रमुख सन्माननीय सदस्यांना बरोबर घेऊन कोर्टाने काय व्हर्डिक्ट दिलेले आहे त्या बाबतीत वकिलांचा सल्ला घेऊन हे डान्सबार बंद ठेवण्यासाठी काय करता येईल, कायद्यामध्ये कोणती दुरुस्ती करावी लागेल, रीट पिटीशन करावे लागेल काय, फुल बेंच समोर जाता येईल काय, नेमके काय केले पाहिजे यासंबंधी कायदे तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढील स्ट्रॅटेजी निश्चित करण्यात येईल.

दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांच्या भावनांची सरकारने त्यावेळी देखील गांभीर्याने दखल घेतली होती. हा निर्णय झाल्यानंतर सर्वच पक्षाच्या महिला संघटनांनी महिलांचे शोषण थांबते, त्यांची अप्रतिष्ठा थांबते म्हणून खूप मोठ्या प्रमाणावर समाधान आणि आनंद व्यक्त केला होता. या विषयाच्या संदर्भात राज्यातील जनमानस लक्षात घेऊन याबाबतीत काय केले पाहिजे याचा निर्णय अधिवेशन संपण्यापूर्वी घेण्यात येईल आणि तो घेताना आजपर्यंत जसे सदन एकसंघ राहिले तसे भविष्यात भूमिका घेताना ती एकत्रितपणेच घेण्यात येईल. मी माननीय विरोधी पक्षनेते आणि सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, त्या काळामध्ये हा कायदा करण्याची जी कारणे आणि उद्देश होता ती कारणे आणि उद्देश आज जशीच्या तशी असल्यामुळे या बाबतीत आपण पूर्ण अभ्यास करुन निर्णय घेणे योग्य ठरेल आणि लवकरच या संदर्भातील निर्णय सदनासमोर आणला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निर्णयाचे दूरगामी परिणाम होणार आहेत. निर्णय देण्याचा न्यायसंस्थेचा अधिकार आहे. आपल्या कायद्यातील काही बाबी अनकॉन्स्टिटयूशनल असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे आपल्या कायद्याच्या ड्राफ्टिंगमध्ये काही दोष असतील म्हणून तो बाद झाला असेल. परंतु राज्यात डान्सबार सुरु होणे हे या राज्यातील जनतेला आणि हे राज्य चालविणा-या राजकीय व्यवस्थेला नको आहे. दूरगामी परिणाम करणारे निर्णय आल्यानंतर आपल्या कायद्यातील

श्री. विनोद तावडे....

चुका दुरुस्त केल्या पाहिजेत, त्यासंबंधी चर्चा केली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीमध्ये डान्सबार सुरु होणार नाहीत, त्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या फुलबेंच समोर जायचे का या बाबतीत चर्चा करु. राज्यात डान्सबार सुरु होता कामा नयेत असे विधिमंडळाच्या सर्व सन्माननीय सदस्यांचे एकमत झाल्यानंतर आता आपण सभागृहाचे पुढील कामकाज थांबविले पाहिजे असे मला वाटते. राज्यात डान्सबार चालणार नाहीत असा निर्णय आपण घेतलेला आहे.

**उप सभापती** : या मुद्यावर चर्चा करताना अनेकदा माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा उल्लेख झाला होता. हा उल्लेख केवळ संदर्भासाठी असून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर कोणतीही टीका नाही. मात्र शासनाने या अनुषंगाने कायदा विचारात घेऊन आवश्यक ती उपाय योजना करावी.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती .....

सभागृहासमोरील कामकाजासंबंधी काय करावयाचे ?

( सभागृहाची बैठक स्थगित करण्याबाबत दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य मागणी करतात.)

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आजचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावे अशी मागणी केलेली आहे. त्या मागणीस आमचा पाठिंबा आहे. त्यामुळे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन आजचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित करावे, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभा□ृ□ाची बैठ□ आता स्थ□ि□ होऊ□ उद्या बुधवार, दि□ां□ 17 जुलै, 2013 रोजी स□ाळी 11.00 वाजता पु□ भरेल.

( सभा□ृ□ाची बैठ□ दुपारी 1 वाजू□ 31 मि□ि□ां□ी, बुधवार , दि□ां□ 17 जुलै, 2013 रोजीच्या स□ाळी 11.00 वाजेपर्यं□ स्थ□ि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही